# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००७ |
| वर्ष | : | आठवे |
| अंक | : | ९ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**
**गणपत्रिका क्रमांक : १२१**

MAHMAR 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • १९३५ • ठाणे



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष आठवे / अंक ९ / सप्टेंबर २००७

## संपादकीय

## ऊर्जा

जागतिकीकरणाचा प्रभाव आणि तंत्रज्ञानाचा प्रसार यांमुळे जग जवळ येत आहे असे आपण म्हणतो, आपला अनुभवही तसा आहे. परंतु अद्यापही कल्पना करता येणार नाही इतक्या टोकाच्या दारिद्र्यात देशाचे खूप मोठे ग्रामीण क्षेत्र आहे. हे दारिद्र्य असण्यामागे अनेक कारणे आहेत. त्यातील ऊर्जेचा, इंधन साहित्याचा अभाव हे एक मोठे कारण आहे. ६०%च्या घरात भारतातील ग्रामीण जनता आजही जीवनावश्यक, प्राथमिक सोयीसुविधांपासून वंचित आहे. साठ वर्षांनंतरही 'विकसनशील' असणाऱ्या देशात ग्रामीण भागांत तंत्रज्ञानाचे, तंत्रज्ञान प्रेरित पद्धतींचे उपयोजन झालेले नाही, हे या दारिद्र्यामागील एक कारण आहे. हेच इतर विकनशील देशांबाबतही सत्य आहे.

शहरातील नागरी सोयी सुविधा मिळणाऱ्या मूठभरांना हे वास्तव आहे, हे मान्य करतानाही काही तरी 'काल्पनिक' वाटते. पण गेल्या दहा एक वर्षांत भारतात झालेल्या एक लाख कुटुंबांहून अधिक शेतकरी कुटुंबांच्या ज्या आत्महत्या नोंदल्या गेल्या त्या कसले निदर्शक आहेत? एक लाख हा शासकीय माहिती स्रोतांतून मिळालेला आकडा आहे. प्रत्यक्षात याहून कितीतरी  अधिक शेतकरी व त्यांची कुटुंबे दारिद्र्याची बळी ठरली असतील. शासनाकडून पिकांना येणार भाव हा मुद्दा आता इतका ऐरणीवर आला आहे की कृषिप्रधान देशात आता शेती हा अनुत्पादक उद्योग ठरायला लागला आहे.

ग्रामीण क्षेत्रातील ऊर्जा स्थितिवर शासनाने नियंत्रण मिळवले नाही. अपारंपरिक ऊर्जा स्रोताचा विचार दूरच, पण पारंपरिक ऊर्जेचाही या भागांत अभाव आहे. अनेक राज्यांत अनेक खेडी अद्यापही अंधारात आहे. वीज हे त्यांच्या दृष्टीने स्वप्नच आहे. वीजेची उपलब्धी ही तर सर्व प्रगतीचा मूल स्रोत आहे. या क्षेत्रातील दरडोई वीजेचा वापर विकसित देशांच्या तुलनेत केवळ २% इतका आहे. कृषी हे माध्यम वापरून निर्माण करता येतील असे ऊर्जा स्रोत अद्यापही दुर्लक्षित आहेत. मध्यंतरी माजी राष्ट्रपती माननीय डॉ. अब्दुल कलाम मुंबईत आले होते. आय.आय.टी. तील त्यांच्या भाषणात त्यांनी संशोधनासंबंधी मोलाचे विचार व्यक्त केले. ग्रामीण भारतातील दारिद्र्य, ऊर्जा स्रोतांचे उत्पन्न यासाठी अशा मूलभूत सामाजिक संशोधनाची व उपयोजित संशोधनाची गरज आहे.

उदा. कृषी उत्पादनांचे माध्यम वापरून निर्माण करता येणारे बायोडिझेल, इथेनॉल किंवा मिथेन सारखे इंधन या ग्रामीण जनतेची इंधनाची गरज पुरवू शकणारे आहे. केवळ भ्रष्टाचाराचे तुणतुणे वाजवण्यापेक्षा प्रामाणिक व सकारात्मक

मलपृष्ठ क्र. ४वर

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष आठवे / अंक ९ / सप्टेंबर २००७

संपादक
डॉ. विजय बेडेकर

कार्यकारी संपादक
प्रा. मोहन पाठक, ठाणे.

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १२ वे / अंक ३रा)

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०
www.vpmthane.org

मुद्रण स्थळ :
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कुनमिंग: चीनच्या प्रगतीची साक्ष देणारे शहर | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| २) | ताजमहालाचे सत्य स्वरूप | डॉ. वा. शं. गोडबोले | ८ |
| ३) | थोर संत श्री. मामासाहेब देशपांडे आणि श्रीज्ञानेश्वरी | डॉ. प्रदीप कर्णिक मुलाखत : प्रा. मोहन पाठक | १२ |
| ४) | आमची चीन यात्रा | सौ. अपर्णा सतीश भोळे | २१ |
| ५) | भारतीय संस्कृती - बीज, मांडिल व साधना (पूर्वार्ध) | श्री. यशवंत साने | २५ |
| ६) | ब्रह्मांड व सौर परिवार (लेखांक चौथा) | श्री. शं. बा. मठ | २९ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# कुनमिंग : चीनच्या प्रगतीची साक्ष देणारे शहर

*चीन येथील शैक्षणिक सहलीत आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांसह गेलेले डॉ. सुधाकर आगरकर यांचा विशेष लेख. - संपादक*

किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी चीनमध्ये दरवर्षी किशोर विज्ञान तंत्रज्ञान नवनिर्मिती स्पर्धा (Adolescent Science and Technology Innovation Contest) आयोजित करण्यात येते. २००७ ची २२ वी स्पर्धा युन्नान प्रांतातील कुनमिंग या शहरात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत प्रथमच भारतीय प्रकल्पाचा समावेश करण्यात आला होता. चीन विज्ञान आणि तंत्रज्ञान संघटना (China Association of Science and Technology) यांच्या विशेष निमंत्रणावरून ठाण्याच्या ए.के. जोशी हायस्कूलचे विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. या चमूला मार्गदर्शन करण्याच्या निमित्ताने कुनमिंगला जाण्याचा योग आला.

कुनमिंग हे चीनच्या युन्नान प्रांताच्या राजधानीचे शहर. युन्नान प्रांत हा तसा मागासलेला. चीनच्या दक्षिणेला असलेला हा प्रांत डोंगरदऱ्यांनी व्यापलेला आहे. भारताच्या अरुणाचल प्रदेशाच्या पूर्व टोकाचे रेखांश ९७ तर कुनमिंग शहराचे रेखांश १०२ आहे. अरुणाचल प्रदेश, ब्रम्हदेश या भागातील भौगोलिक परिस्थितीशी मिळतीजुळती परिस्थिती युन्नान प्रांतात आहे. परंतु मानवी प्रगतीची चिन्हे मात्र वेगवेगळी आहेत. जंगलाची राखण तर त्यांनी केलेलीच आहे; त्याचबरोबर शेतीचाही विकास केला आहे. कुनमिंग शहराच्या चोहोबाजूला आपल्याला याचा अनुभव येतो. उतारावर पायऱ्या पायऱ्यांनी शेती (Step Farming) केली आहे तर जेथे सपाट जागा सापडेल तेथे मोठ्या प्रमाणावर हरितगृहे बांधून थोड्या जागेत ते मोठ्या प्रमाणावर पिक काढतात. त्यात भाजीपाला आणि फुलझाडे वाढवितात. त्यामुळे फुलांचे उत्पन्न कुनमिंग परिसरात मोठ्या प्रमाणावर होते. ही सर्व फुले कुनमिंग शहरात विक्रीसाठी आणली जातात.



रस्त्याच्या बाजूला असलेली हरितगृहे

कुनमिंग शहरातील फूलबाजार (Flower Market) हे एक प्रेक्षणीय स्थळ आहे. शेकड्यांनी प्रवासी या स्थळाला भेट द्यायला येतात. विक्रीकेंद्राच्या बाहेर वाहने उभी ठेवण्यासाठी प्रशस्त जागा आहे. विक्रीकेंद्राचा आकारही अजस्त्र आहे. त्यात अनेक प्रकारची रंगीबेरंगी फुले विक्रीसाठी ठेवलेली असतात. नैसर्गिक फुलांबरोबरच कृत्रिम फुले येथे विक्रीसाठी आहेत. याखेरीज फुलांतील सुवासिक अर्क काढून अत्तरेदेखील आहेत. विक्रीकेंद्रातून एक फेरफटका मारणे हा खरोखरच लक्षात राहण्यासारखा अनुभव आहे. या ठिकाणाचे नाव फ्लॉवर मार्केट, असे असले तरी फुलांखेरीज इतरही वस्तू मार्केटमध्ये विक्रीसाठी आहेत. व्यापार करण्याची नवीन शक्कल चीनी लोकांनी

येथे लटविलो आहे. बसमधून उतरून जेव्हा आपण फ्लॉवर मार्केटमध्ये शिरतो तेव्हा आपण प्रत्यक्ष कॉफी शॉपमध्ये शिरत असतो. त्याच्या प्रवेशद्वाराजवळ कॉफीसंबंधीचे मोठे प्रदर्शन आहे. कॉफीची लागवड कशी करतात, त्यापासून कॉफी कशी मिळवितात, कॉफीत कोणते घटक असतात, त्यांचा शरीराला काय उपयोग होतो अशा अनेक बाबींची माहिती या प्रदर्शनात आहे. जगातील विचारवंत आणि शास्त्रज्ञ हे कॉफी पीत असत हे दाखविणारे फोटोदेखील या प्रदर्शनात आहेत. त्यात अल्बर्ट आइन्स्टाईन या प्रसिद्ध शास्त्रज्ञाचा फोटो आहे.

प्रदर्शन पाहून आपण जेव्हा आत प्रवेश करतो तेव्हा सुंदर गणवेशातील चिनी मुली आपले स्वागत करतात. एका लहानशा कपात थोडीशी कॉफी ओतून हसतमुखाने ती आपल्याला देतात. कॉफीचा आस्वाद घेत आपण पुढे जातो तेव्हा अशाच मुलींचा समूह आपल्याला दिसतो. त्या स्थळाला आपण पोहोचतो तोपर्यंत आपल्या कपातील कॉफी संपलेली असते. त्याच कपात नवीन कॉफी दिली जाते. अशा पद्धतीने ४-५ प्रकारच्या कॉफीची चव आपल्याला घ्यायला मिळते. कॉफीचे नमुने आपल्याला जेथे चवीला देतात त्याच्या आजूबाजूलाच ती कॉफी विक्रीसाठी ठेवलेली असते. चव घेऊन झाल्यानंतर आवडलेली कॉफी घरी घेऊन जाण्याची इच्छा आपल्याला होतेच. कॉफी विक्रीचा हा एक उत्तम मार्ग त्यांनी शोधून काढलेला आहे. कॉफी पावडरखेरीज कॉफीची चव असलेले पापड, बिस्किटे, चॉकलेट हे देखील या दुकानात विक्रीला ठेवलेले आहेत. प्रत्येक ठिकाणी नमुना चवीला ठेवून ती खरेदी करण्याची इच्छा आपल्या मनात निर्माण केली जाते. आवळा देऊन कोहळा काढण्याचीच ही युक्ती आहे. प्रत्येक व्यक्ती काहीनाकाही खरेदी करूनच या दुकानातून बाहेर पडतो. कॉफी शॉपमधून आपण बाहेर पडतो ते फ्लॉवर मार्केटमध्ये शिरतो. तेथून बाहेर पडताच आपण एका प्रशस्त दुकानात येतो. या दुकानात अनेक प्रकारच्या शोभेच्या वस्तू विक्रीसाठी ठेवलेल्या आहेत. त्यामध्ये कापडाच्या वस्तू, प्लॅस्टिकच्या वस्तू, बांबूपासून बनविलेल्या वस्तू अशा अनेक वस्तूंचा समावेश आहे. या सगळ्या वस्तू एवढ्या पद्धतशीरपणे लावून ठेवलेल्या आहेत की त्यांच्याकडे आपले लक्ष सहजच वेधले जाते. या दुकानातून देखील काहीना काही वस्तू खरेदी करूनच आपण बाहेर पडतो. तोच आपण धान्य आणि बियांच्या दुकानात प्रवेश करतो. आपल्याला एखाद्या धान्याचे किंवा फुलझाडाचे बी पाहिजे असेल तर ते येथे मिळते.



फ्लॉवर मार्केट मधील दृश्य

कुनमिंग हे तसे लहानसे शहर आहे. महाराष्ट्रातील नागपूर शहराएवढा त्याचा पसारा असावा. शांघाय शहराजवळ जसे अनेक उद्योगधंदे आले तसे कुनमिंगला आले नाहीत. तरीही शहराचा कायापालट करण्याचे चीन सरकारने ठरविले. मुळचे बकाल शहर, दाटीवाटीने बांधलेली घरे, अरूंद बोळ याच्या खुणा आपल्याला जागोजागी दिसतात. त्याचबरोबर मागील दशकात केलेल्या प्रगतीच्या पाऊलखुणाही दिसतात. विमानतळाच्या बाहेर पडताच पहिल्यांदा नजरेत भरतात ते शहरातील रूंद रस्ते. बहुतेक रस्ते ४ किंवा ६ लेनचे आहेत. शहरात उड्डाणपुलाची तर मालिकाच आहे. काही उड्डाणपूल तर मैलोगणती लांब आहेत. खड्डा शोधून सापडणार नाही असे

हे रस्ते. मागील दशकात शहरातील वाहनांची संख्या भरमसाठ वाढली आहे. या सर्वांना पुरून उरेल एवढे रुंद रस्ते शहरात बांधलेले आहेत. फुलझाडांची वाट हा या परिसरातील मुख्य व्यवसाय असल्याचे रस्त्याच्या मधोमध आणि रस्त्याच्या दोन्ही बाजूला लावलेल्या फुलझाडांवरून लक्षात येते. रंगीबेरंगी फुलझाडे अशा पद्धतीने लावलेली आहेत की जणू आपण बागेतूनच जात आहोत असा आपल्याला भास होतो. शहरातील प्रत्येक चौक फुलांनी सुशोभित केलेला आहे. चौकात फुलांची झाडे तर लावलेलीच आहेत. त्याचबरोबर सिमेंटचे खांब उभारून त्यांना फुलांनी सजविलेले आहे. त्यामुळे फुलांच्या शहरातून आपण फिरतो आहोत असे आपल्याला वाटते. त्यामुळेच या शहराला वसंत शहर (Spring City) असे टोपणनाव मिळालेले आहे. युरोपात हिवाळा संपून जेव्हा वसंतऋतू सुरू होतो तेव्हा रंगीबेरंगी फुले दिसू लागतात. अशाप्रकारचे आनंदमय वातावरण कुनमिंगशहरात वर्षभर असते. त्यामुळे स्प्रिंगसिटी हे या शहराचे नाव सार्थ ठरते.

मुळचा मागासलेला भाग त्यामुळे शहरातील सोयीसुविधा मर्यादित होत्या. परंतु मागील दशकात विशेष प्रयत्न करून शहराचे रूप पालटण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याचे एक मूर्तिमंत उदाहरण म्हणजे आंतरराष्ट्रीय समारंभ केंद्र (International Convention Centre) हे होय. सभा, समारंभ, परिषदा यांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन करता यावे यासाठी या केंद्राची निर्मिती करण्यात आली. यात युनान भव्य सभागृह (Yunnan Grand Theatre) चा समावेश आहे. हे सभागृह खरोखरच भव्य आहे. एकावेळी सुमारे ४००० जण बसू शकतील एवढी त्याची क्षमता आहे. सभागृह सुंदर सजविलेले असून तंत्रज्ञानच्या सर्व सुविधा तेथे आहेत. याच सभागृहात किशोर नवनिर्मिती स्पर्धेचा उद्घाटन सोहळा पार पडला. इमारतीच्या पहिल्या मजल्यावर यापेक्षा थोडे लहान सभागृह आहे. तेथेदेखील सर्व सुविधा आहेत. या सभागृहात स्पर्धेचा समारोप समारंभ पार पडला. सभागृहाच्या पुढे दोन प्रशस्त इमारती आहेत. त्यातील एका इमारतीत विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. आवश्यकतेनुसार फलकांची आखणी करणे, वरच्या बाजूला पोस्टर्स लावणे, प्रत्येक फलकावर उजेड पडेल अशी विजेची सोय अशा अनेक सुविधा या इमारतीत आहेत. इमारतीचा आकार साधारणपणे २०० फूट x ४०० फूट असून मध्ये कुठेही खांब आडवे येत नाहीत. वेगवेगळ्या प्रकारच्या प्रदर्शनासाठी या इमारतीचा उपयोग होतो. इमारतीची भव्यता, त्यातील सुविधा पाहून मन थक्क होते.



नवनिर्मिती स्पर्धेचा उद्घाटन सोहळा

आपल्याकडे दाखविण्यासारखे जे असेल त्याचे प्रदर्शन करावे हे युन्नान प्रांतातील अधिकाऱ्यांनी बरोबर ताडले. फळाफुलांचे उत्पादन हे युन्नान प्रांताचे वैशिष्ट्य. त्याचे मोठे प्रदर्शन त्यांनी कुनमिंग शहरात उभारले आहे. कुनमिंग हार्टी एक्स्पो गार्डन (Kunming Horti Expo Garden) असे त्याचे नाव आहे. बागेत जाण्यासाठी आपण जेव्हा प्रवेशद्वाराजवळ येतो तेव्हा भव्य प्रवेशद्वार आणि त्याच्या शेजारी लावलेले विविध देशांचे ध्वज आपले लक्ष वेधून घेतात. दारातून आत प्रवेश करताच फुलांनी सजवलेले घड्याळ आणि बोट आपल्या नजरेत भरते. बागेचा आकार एवढा मोठा आहे की एका ठिकाणाहून

दुसऱ्या ठिकाणी वाहनाने जावे लागते. तशी व्यवस्था बागेच्या व्यवस्थापकांनी आधीच करून ठेवलेली आहे. या वाहनात बसून आपण सुरुवातीला जातो ते एका हरितगृहाजवळ. या हरितगृहात थंड प्रदेश, वाळवंटी प्रदेश आणि विषुववृत्तीय प्रदेश या जगाच्या वेगवेगळ्या भागात वाढणाऱ्या वनस्पती लावून ठेवलेल्या आहेत. या वनस्पती पाहतानाच त्या परिसरातील वातावरणाचा आपल्याला अंदाज यावा यासाठी विशेष व्यवस्था केलेली आहे. उदाहरणादाखल थंड प्रदेशातील वनस्पती जेथे वाढविल्या आहेत त्या भागाला अल्पाईन असे नाव दिलेले असून तो संपूर्ण विभाग वातानुकुलीत केलेला आहे.



हार्टिएक्स्पो गार्डनचे प्रवेश द्वार

एक्स्पो गार्डनचा परिसर फारच मोठा आहे. त्यात वेगवेगळ्या प्रांताच्या नावाने लहान लहान बागा आहेत. या बागेमध्ये त्या त्या परिसरातील वनस्पती वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. सगळ्यात नजरेत भरतात त्या वेगवेगळ्या देशाच्या नावाने निर्माण केलेल्या बागा. यामध्ये इस्राईल, फ्रान्स, ब्रिटन, डेन्मार्क, पाकिस्तान, इजिप्त इत्यादी देशाच्या बागा आहेत. त्या त्या देशाची वैशिष्ट्ये दाखविण्याचा प्रयत्न या बागांमध्ये करण्यात आला आहे. उदाहरणार्थ, इस्राईलच्या बागेत त्या देशातील शेती दाखविण्याचा प्रयत्न केला आहे, हॉलंडच्या बागेत पवनचक्की उभारली आहे, मियानमारच्या बागेत तेथील सुवर्णमंदीराचे प्रतिरूप दाखविले आहे. प्रत्येक देशाची बाग पाहणे, त्याच्यापुढे लिहिलेला फलक वाचने हा खरोखरच ज्ञानवर्धक अनुभव आहे. या बागा पाहात असताना एक खटकलेली गोष्ट अशी की त्यात भारताची बाग नाही. एक्स्पो गार्डनची स्थापना १९९९ मध्ये झाली. त्यावेळेस भारत-चीन संबंध एवढे चांगले नसतील. परंतु आता मात्र हे संबंध खूप सुधारले आहेत. भारताची बाग निर्माण करण्याच्या दृष्टीने आता प्रयत्न करायला हरकत नाही. या बागेला भेट देणारे हजारो पर्यटक भारताचा विभाग पाहू शकतील.




मियानमार देशाची बाग


एक्स्पो गार्डनचे वेगवेगळे विभाग आहेत. त्यामुळे बांबूचे जंगल आहे, चहाचा मळा आहे, फुलांची बाग आहे त्याचबरोबर छोटेसे स्टोन फॉरेस्ट आहे. वेगवेगळ्या प्रकारची फुलपाखरे एकत्रितपणे वास करतील अशा पद्धतीने एक स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला आहे. रंगीबेरंगी फुलांनी सजवलेले रथ रस्त्याने फिरत असतात. त्यात देशाच्या विविध भागातील जमातीचे कपडे घालून त्यांच्या प्रमाणेच नाच सादर करणाऱ्या कलाकारांचा समूह असतो. या रथांना वेगवेगळे आकार दिलेले असतात आणि वेगवेगळ्या प्रकारच्या रंगीबेरंगी फुलांनी त्यांच्यात विविध आकृत्या निर्माण केलेल्या असतात. त्यामुळे हे रथ आपले

लक्ष वेधून घेतात. एक्स्पो गार्डनमध्ये फेरफटका मारणे हा खरोखरच आनंद देणारा अनुभव आहे.



एक्स्पो गार्डनमधील एक रथ

एक्स्पो गार्डनमध्ये एक खुले सभागृह आहे. या सभागृहाचे छत फुलपाखरांच्या आकाराचे आहे. काळ्या खडकांची पार्श्वभूमी या सभागृहाच्या रंगमंचाला आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या कार्यक्रमांना आवश्यक असलेली प्रकाशयोजना या सभागृहात निर्माण करण्यात आलेली आहे. साधारणपणे ३००० व्यक्ती एका वेळेस बसू शकतील अशी आसनव्यवस्था आहे. या सभागृहात मनोरंजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात चीनच्या वेगवेगळ्या प्रांतातील वेगवेगळ्या जमातींचे नाच प्रदर्शित करण्यात आले. त्याचबरोबर वेगवेगळ्या कंपन्यांनी स्पर्धेतील उत्तम प्रवेशांना देऊ केलेल्या बक्षिसांचे वितरणदेखील करण्यात आले. चीनमध्ये कार्यरत असलेल्या अनेक खाजगी कंपन्या होतकरू विद्यार्थ्यांना बक्षिस देण्यासाठी पुढे येतात ही वाखाणण्याची बाब आहे.



एक्स्पो गार्डनमधील भव्य सभागृह

कुनमिंग शहरातील रस्ते, आंतरराष्ट्रीय परिषद केंद्र, फ्लॉवर मार्केट, एक्स्पो गार्डन या सगळ्या गोष्टी भव्यदिव्य आहेत. वीस वर्षापूर्वी या शहरात काहीच नव्हते. आजूबाजूच्या सरकारी जमिनीवर काम करणारे शेतकरी आणि लहानलहान सरकारी कारखान्यात काम करणारे मजूर या गावात राहात असत. त्यांच्यासाठी बांधलेल्या घरांचे अवशेष आजही आपल्याला दिसतात. कम्युनिस्ट राजवट, सरकारी गणवेश, मर्यादित उत्पन्नावर राहणारे लोक हे चित्र बदलून खाजगी व्यवसाय, आपल्या आवडीचे गणवेश, राहण्यासाठी चांगली घरे असे स्वरूप असलेले नवीन शहर वसवले गेले आहे. शांघाय शहराचे स्वरूप पाहून आपले डोळे दिपतात. प्रगतीच्या मार्गावर असलेले कुनमिंग शहर पाहून त्याच्या प्रगतीचे स्वरूप कळते. मुंबईचे शांघाय करण्याच्या वल्गणा करणाऱ्यांनी या पाऊलखुणांचा जरूर विचार करावा.

डॉ. सुधाकर आगरकर
४, अनिल को-ऑप. सोसायटी,
नगरपालिका प्राथमिक शाळेजवळ, काटेमनावली,
कल्याण (पूर्व)
दूरध्वनीः ९१-२५१-२३३२५२१
Email: s_agarkar@hotmail.com

•••

# ताजमहालाचे सत्य स्वरूप

*ताजमहाल संबंधीचे संशोधने एक वेगळेच सत्य समोर आणतात. डॉ. पु.ना. ओक व डॉ. गोडबोले या संशोधकांच्या प्रयत्नांतून माहीत झालेल्या ताजमहालच्या सत्य स्वरूपाबद्दल- संपादक*

गेली दोनशे वर्षे ताजमहालाविषयी अनेक दंतकथा पसरल्या आहेत. त्या सर्वांत एक ब्रह्मवाक्य मात्र कायम असते. 'बांधकामासाठी २०,००० माणसे २२ वर्षे सतत काम करत होती'. ही गोष्ट जगातल्या सगळ्या आबालवृद्धांना ठाऊक आहे. सहाजिकच प्रश्न पडतो की हे आकडे आले कोठून?



टॅव्हर्नियर नावाचा धाडसी फ्रेंच व्यापारी शिवाजीच्या काळात (१६३८ - १६६८) ६ वेळा हिंदुस्तानात येऊन गेला. त्याने त्याची प्रवासवर्णने लिहिली. 'Travels in India' या पुस्तकात तो म्हणतो,'' या (ताजमहालाच्या) बांधकामाची सुरुवात आणि शेवट मी बघितला आणि या कामावर २०,००० माणसे २२ वर्षे सतत काम करीत होती.''

टॅव्हर्नियरचे पुस्तक प्रथमत: १६७५ मध्ये प्रसिद्ध झाले. त्या काळी एकट्याने सगळ्या अडीअडचणींना तोंड देऊन, देशोदेशींच्या लोकांच्या भाषा, आचारविचार, हवामान, खाणेपिणे हे सगळे संभाळून, हिरे, माणिक, मोती अशा मौल्यवान खड्यांचा व्यापार यशस्वीपणे करून सुखरूप परत येणे हेच आश्चर्य होते. टॅव्हर्नियरने ६ वेळा अशा सफरी केल्या. त्याच्या पुस्तकाचे साहजीकच इंग्रजीत भाषांतर होऊन १६७७ ते १८११ ह्या काळांत आठ आवृत्त्या निघाल्या.

१८८९ मध्ये डॉ. बॉल ह्या गृहस्थाने मूळ फ्रेंच पुस्तकाचे इंग्रजीत भाषांतर केले, चुका सुधारल्या व भरपूर तळटीपा घातल्या. त्याबरोबरच त्याने अभ्यास करून, प्रस्तावनेत टॅव्हर्नियरच्या सफरीचे तपशील दिले. त्यावरून असे सिद्ध होते की टॅव्हर्नियर आग्र्याला दोनदाच गेला होता. १६४० - ४१ च्या थंडीत आणि १६६५ मध्ये. या माहितीमुळे एक विलक्षण प्रश्न निर्माण होतो.

इतिहासकार सांगतात की शहाजहानची बायको मुमताज ही १६३१ मध्ये वारली आणि तिच्या थडग्याचे काम लगेचच सुरू झाले. पण तसे असेल तर टॅव्हर्नियरने बांधकामाची सुरुवात बघणे शक्यच नव्हते. कारण तो तिच्या मृत्यूनंतर जवळजवळ १० वर्षे उलटून गेल्यानंतर आग्र्याला आला. तसेच औरंगजेबाने १६५८ पासून शहाजहानला आग्र्याच्या लाल किल्ल्यात कैद करून ठेवले होते. टॅव्हर्नियर तर दुसऱ्यांदा आग्र्याला आला १६६५ मध्ये. औरंगजेबाने आपल्या आईच्या थडग्याचे काम पुरे केले असे कोणीच म्हणत नाही. म्हणजे टॅव्हर्नियरने कामाची शेवटही बघितली नाही. तेव्हा यामुळे '२०,००० माणसे २२ वर्षे सतत काम करीत होती.' हे विधान निरर्थक आहे. गेली ११७ वर्षे हे सत्य इतिहासकारांनी आमच्यापासून लपवून ठेवले आहे. कारण हे मान्य केले की दंतकथेतला दमच निघून जातो.

'हिंदू राजांना ऐतिहासिक दृष्टिकोनच नव्हता. इतिहास लिहिला तो फक्त मुसलमान राजांनी' असे इंग्रज लेखक

नेहमी म्हणतात. ठीक, तर मग शहाजहानच्या काळी जो बादशहानामा लिहीला गेला त्याकडे वळू या.

Asiatic Society of Bengal या संस्थेने १८६७ (भाग १), १८६८ (भाग २) या दोन वर्षी बादशहानामा पुस्तकरूपाने छापला. संकलन करणारे दोघे मुसलमान मौलवी होते व त्यांच्यावर एका इंग्रज मेजरची देखरेख होती. आश्चर्य असे की बादशहानाम्यांतल्या पानांचा संदर्भ देऊन 'शहाजहानने ताजमहाल कसा बांधला' असे मात्र कोणीही इतिहासकार सांगत नाही. हे काय गौडबंगाल आहे? ते बघू.

महंमद बिन कासीमच्या सिंधवरच्या स्वारीपासून मराठ्यांच्या पाडावापर्यंतचा १२०० वर्षांचा इतिहास Elliot आणि Dowson या दोन इंग्रजांनी, (कसा का असेना) लिहिण्याचे साहस केले. फक्त मुसलमानी राज्यकर्त्यांच्या नोंदीवरूनच हा इतिहास लिहीला आहे. १८६७ ते १८७७ या काळात त्या इतिहासाचे ८ खंड प्रसिद्ध झाले. सातवा खंड, शहाजहान आणि औरंगजेब ह्यांच्या कारकिर्दीवर आहे. परंतु त्या खंडात 'ताजमहाल' असा शब्दच नाही. वास्तविक, बादशहानाम्यानुसार शहाजहानच्या काळाचा इतिहास आम्ही सांगितला खरा; पण त्यात ताजमहालाच्या बांधकामाचा मात्र कोठेही उल्लेख आढळला नाही, असे त्या दोघा इंग्रजांनी स्पष्टपणे सांगायला हवे होते. पण ते दोघे याविषयी ब्र काढीत नाहीत. आमच्या इतिहासकारांनी हे सत्यही गेली १३० वर्षे लपवून ठेवले आहे.

१८९६ मध्ये खानबहादूर सय्यद महमद लतीफ ह्या गृहस्थांनी 'आग्रा आणि आजूबाजूचा परिसर' या विषयावर पुस्तक लिहिले. त्यांनी ठिकठिकाणी बादशहानाम्याचा संदर्भ दिला आहे. परंतु बादशहानाम्यातल्या नेमक्या पानांचे क्रमांक मात्र दिले नाहीत. लतीफ त्यांच्या पुस्तकात १०५ पानावर म्हणतात, 'The site selected for the mausoleum was originally palace of Raja Mansingh, but it was now the property of his grandson Raja Jaisingh'

अनेकांनी लतीफच्या Agra: Historical & Descriptive ह्या पुस्तकाचा संदर्भ दिला आहे. परंतु त्या पुस्तकात नेमके काय म्हटले आहे हे कोणीच बघितले नाही. हे सत्यही आमच्या इतिहासकारांनी आमच्यापासून लपवून ठेवले आहे.

१९०५ मध्ये H. R. Nevill ह्या इंग्रज अधिकाऱ्याने Agra District Gazetteer चे संपादन केले. ह्या ग्रंथात Raja Mansingh's Palace हे शब्द बदलून Raja Mansingh's piece of land असे शब्द त्याने घातले. तेव्हापासून राजा मानसिंगची भूमी, शहाजहानने, मानसिंगचा नातू राजा जयसिंग ह्याचेकडून घेतली असे सगळ्या लेखकांनी, कसलाही विचार न करता, पुन्हा पुन्हा लिहिले आहे . गेली शंभर वर्षे सर्व वाचक तेच सत्य मानीत आहेत. १९२५ च्या मराठी ज्ञानकोशांतही तेंच म्हंटले आहे.

इंग्रजांना अशी फसवणूक करण्याचे कारण काय? त्या काळच्या घटना बघितल्या की स्पष्टीकरण मिळते. थोडक्यात त्या घटना अशा -

१९०१ - कर्झनने पंजाबचे काही जिल्हे तोडून वायव्य सरहद्द प्रांत निर्माण केला. त्या नव्या प्रांतात हिंदू अल्पसंख्य झाले आणि त्यांच्या दुर्दशेला सुरुवात झाली.

१९०३ - 'बंगालची फाळणी होणार' अशी घोषणा कर्झनने केली.

१९०५ - कर्झनने राजीनामा दिला, पण बंगालची फाळणी अंमलात आणली.

१९०६ - महाराज्यपाल लॉर्ड मिंटो ह्याला मुसलमानांचे शिष्टमंडळ भेटले. इंग्रजांनी मुसलमानांना विशेष सवलती द्याव्यात अशी विनंती त्या शिष्टमंडळाने केली. हा बनाव अर्थातच इंग्रजांनीच घडवून आणला होता.

डिसेंबर - डाक्का येथे मुस्लिम लीगची स्थापना झाली.

१९०९ - मोर्ले - मिंटो सुधारणांमध्ये मुसलमानांना स्वतंत्र मतदारसंघ दिले गेले.

इंग्रजांच्या राज्यात १८७३ ते १९१४ ह्या काळात निरनिराळ्या इंग्रज अधिकाऱ्यांनी बाबरनामा, हुमायुन नामा, अकबरनामा, ऐने अकबरी, तझुके जहांगिरी यांची इंग्रजीत भाषांतरे केली. परंतु बादशहानाम्याचे इंग्रजी भाषांतर मात्र कोणीच केले नाही. एवढेच नव्हे तर १८६७ ते २००७ ह्या १४० वर्षांच्या प्रदीर्घ काळात जगातल्या एकाही इतिहासकाराला बादशहानाम्याचे भाषांतर करावेसे वाटले नाही, हे सत्यही इतिहासकारांनी लपवून ठेवले आहे.

वरील सर्व घटनांवरून १९०५ च्या Agra District Gazetteer मध्ये नेव्हिलने फसवणूक का केली हे लक्षात येते.

आता आश्चर्य असे की मौलवी अहमद (History of Taj 1905) आणि यदुनाथ सरकार (Anecdotes of Aurangzeb, 1912) हे दोघे शहाजहानने राजा मानसिंगची जागा घेतली ह्या विधानाचा संदर्भ देतात- (बादशहानामा, खंड १ पान ४०३). परंतु या पानावर नेमके काय म्हटले आहे, ते कोणीच बघितले नाही.

१९६४ मध्ये दिल्लीचे श्री. पु.ना. ओक यांना ताजमहालाविषयी शंका आली आणि 'तो शहाजहानने बांधलेला नसून' पूर्वीचा हिंदूंचा प्रासाद असावा असे मत त्यांनी व्यक्त केले. त्यांचे अनेकांशी वादविवाद झाले. त्यांच्या विरोधकांत एक काश्मिरी पंडीत होते. ते दोघे भारत सरकारच्या संग्रह कार्यालयात गेले. तिथल्या अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार त्या पंडिताने बादशहानामा उघडला. ते फारसी भाषा उत्तम जाणणारे होते. बघताबघता ते पहिल्या खंडाच्या ४०३ पानावर आले. या पेश आझिन मंझिले राजा मानसिंग बूद, बदारी वक्त या राजा जयसिंग - ही ओळ बघितल्यावर ते आश्चर्यचकित झाले. त्यांनी प्रामाणिकपणे मान्य केले की 'शहाजहानने मुमताझला पुरण्यासाठी राजा मानसिंगचा प्रासाद घेतला'. त्या गृहस्थांनी लौकरच ४०२/४०३ या पानांची शब्दश: भाषांतरे करून ती ओकांना दिली. ओकांनी १९६८ मध्ये Taj Mahal is a Hindu Palace या पुस्तकात ती भाषांतरे छापली. दुर्देवाने 'ही भाषांतरे माझी नाहीत, एका फारसी जाणणाऱ्या तज्ञाने मला करून दिली आहेत. परंतु तो सरकारी नोकरीत असल्याने त्याचे नाव प्रकट करू नये अशी त्याची विनंती आहे' असा स्पष्ट खुलासा ओकांनी कधीच केला नाही. त्यामुळे त्यांच्या विरोधकांचे फावले. 'ओकांचे भाषांतर चुकीचे आहे' असे ते म्हणू लागले.

ओकांचे पुस्तक मला लंडनला १९७७ मध्ये मिळाले. मी वर्षभर संशोधन केले. सर्वसाधारणत: संदर्भग्रंथ म्हणून ज्यांचा उल्लेख होतो ते सगळे ग्रंथ मी बघितले. इंग्लंडमध्ये ते सहज शक्य आहे. ओकांना ती सुविधा नव्हती. सगळ्या ग्रंथातून एकच निष्कर्ष निघाला - ताजमहाल हा शहाजहानने बांधला नसून तो एक प्राचीन हिंदू प्रासाद आहे. Taj Mahal - Simple Analysis of a Great Deception हे माझे पुस्तक १९८६ मध्ये प्रसिद्ध झाले. १९८१ मध्ये काही संदर्भ बघताना मला दाट शंका आली की इंग्रजांना ताजमहालाचे सत्यस्वरूप फार पूर्वीपासून माहिती असावे. संशोधनाचा विस्तार होता होता Taj Mahal & The Great British Conspiracy हे लिखाण इतिहासपत्रिका या त्रैमासिकात १० भागात प्रसिद्ध झाले. १७८४ ते १९८४ ह्या २०० वर्षांच्या काळात, काय पुरावे उपलब्ध झाले, ते ब्रिटीशांनी विकृत स्वरूपात कसे मांडले व त्यामागे त्यांचा हेतू काय होता, ह्या सगळ्याचा उहापोह त्या ३४० पानी पुस्तकात केला आहे.

लंडनमध्ये Royal Institute of British Architects (RIBA) ही एक प्रतिष्ठित संस्था आहे. १९८० ह्या वर्षी त्यांच्या मासिकात ताजमहालाची दंतकथा खोटी आहे

अशा आशयाची दोन पत्रे प्रसिद्ध झाली. एक श्री. पु. ना. ओकांचे आणि दुसरे माझे. या दोन पत्रांना अजून कोणीही उत्तर दिले नाही. ओकांनी बादशहानाम्याचा संदर्भ दिला. माझ्या पत्रांत असे काय आहे?

शहाजहान सत्तेवर येण्यापूर्वी आग्रा शहर कसे होते? याबद्दल सगळे इतिहासकार मूग गिळून गप्प बसतात. इंग्रजांप्रमाणेच डच व्यापाऱ्यांच्याही हिंदुस्थानात वखारी होत्या. आग्र्याला सुद्धा एक होती. फ्रान्सिस्को पेलसार्ट हा डच व्यापारी १६२० ते १६२७ ह्या काळात आग्र्याला होता. १६२६ मध्ये त्याने एक व्यापारी प्रतिवृत्त तयार केले. त्यात त्या वेळच्या आग्रा शहराचे वर्णन आहे. तो म्हणतो, 'हे शहर अरुंद आणि लांबलचक आहे. कारण सगळ्या बड्या श्रीमंत गृहस्थांनी आपले वाडे नदीकाठी बांधले आहेत. त्यामुळे १०.५ मैलाचा यमुना नदीचा काठ हा अमीर / उमरावांच्या राजवाड्यांनी भरलेला आहे. त्यापैकी काही महत्त्वाचे राजवाडे खालील जणांचे आहेत. उत्तरेकडून दक्षिणेकडे पहिला प्रासाद बहादुर खानाचा, नंतर राजा भोजाचा ... मग येतो लाल किल्ला (या किल्ल्याचे पूर्ण वर्णन पेलसार्ट करतो) त्याच्या पलीकडे एक मोठा बाजार आहे. त्यानंतर येतात बड्या उमरावांचे राजवाडे - मिर्झा अबदुल्ला, आगा नीर, महाबत खान, राजा मानसिंग आणि शेवटी राजा माधोसिंग यांचे राजवाडे आहेत.

या प्रतिवृत्ताचे इंग्रजी भाषांतर पुस्तकरुपाने १९२५ मध्ये प्रसिद्ध झाले. १६२६ मध्ये यमुना नदीचा १०.५ मैलाचा काठ राजवाड्यांनी भरलेला होता. त्यापैकी जो प्रासाद 'राजा मानसिंगचा राजवाडा' म्हणून ओळखला जात असे, तो शहाजहानने मुमताझला पुरण्याच्या मिषाने गिळंकृत केला, असे खुद्द बादशहानाम्यातच लिहिले आहे. ही वस्तुस्थितीसुद्धा इतिहासकारांनी आमच्यापासून लपवून ठेवली आहे.

आमच्या आरडाओरडीमुळे, प्रयत्नांमुळे एक बदल मात्र अवश्य झाला. भारत सरकारच्या पुरातत्व खात्याने १९८२ मध्ये Taj Museum ह्या नावांची पुस्तिका छापली. त्यात नेहमीचीच दंतकथा दिली असली तरी एक महत्त्वाचा फरक आहे. लेखकद्वय म्हणतात, 'मुमताझ बऱ्हाणपुरला मेली व तिचे दफनही तिथे झाले. शहाजहानने सहा महिन्यानंतर तिचे प्रेत उकरुन आग्रा येथे पाठवले. तिथे तोपर्यंत राजा मानसिंगचा राजवाडा होता.' तो राजवाडा म्हणजेच आजचा ताजमहाल. एक प्रेत पुरण्यासाठी राजवाड्यांत बदल असे काय करावे लागतात?

डॉ. वा. शं. गोडबोले
१४, टर्नबेरी वॉल, बेडफोर्ड, एमके ४१,
एझेड, इंग्लंड.
Email : vgodbole2@ntlworld.com

वन्दे मतरम् ।

माहीम, मुंबई ४०० ०१७.
२४/८/२००७

मित्रवर्य यशवंत साने
यांस

सस्नेह नमस्कार. 'दिशा' मध्ये प्रसिद्ध होणारी तुमची लेखमाला उत्तम आहे. ती मी काळजीपूर्वक वाचतो. आजचा भारतीय माणूस हा मॉडर्न भौतिकवादी ज्ञानाने भारलेला आणि या मॉडर्न ज्ञानाचा भारवाहक. 'भारतीय ज्ञानाबद्दल संशय निर्माण करण्यात गुंतलेले आहेत स्वतः असहिष्णु आहेत' हे तुमचे म्हणणे खरे आहे. Symol Sceince चा भारतीय स्पिरिच्यूअल ज्ञानात असा आणि कोणता उपयोग होतो हे वाचण्यास मी उत्सुक आहे. या लेखनमालेबद्दल नजिकच्या काळात येणाऱ्या दीपावली निमित्त अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!


आपला,
डॉ. मो. दि. पराडकर.

# थोर संत श्री. मामासाहेब देशपांडे आणि श्रीज्ञानेश्वरी

## (दिशासाठी विशेष मुलाखत)

*प्रकाशन संस्था असंख्य असतात. पण श्रीवामनराज प्रकाशन संस्था, तिच्या प्रेरणा, निष्ठा आणि प्रकाशने यांत जसे वेगळेपण आहे, तसे अन्य संस्थांत क्वचितच आढळेल. त्या दृष्टीने या प्रकाशनांचा गाढा अभ्यास करणारे, दिशाचे चाहते, लेखक, वाचक व हितचिंतक डॉ. कर्णिक यांची संस्थेच्या रौप्यमहोत्सवानिमित्त ही विशेष मुलाखत. - संपादक*

पाठक : श्रीवामनराज प्रकाशन संस्थेचा यंदाच्या वर्षी रौप्य महोत्सव सुरु झाला आहे, त्या संदर्भातली आपली एक मुलाखत 'सकाळ' दैनिकाच्या दिनांक २९ एप्रिल २००७, रविवार रोजी वाचली. ती मुलाखत त्रोटक आहे. अर्थात, दैनिकात जेवढी अपेक्षित आहे, तेवढी ती आहे; परंतु मुलाखत वाचत असताना, असे सतत जाणवत होते की, या प्रकाशन संस्थेने इतके अपूर्व काम केले आहे की, त्याची विस्तृत माहिती सर्वांना व्हायला हवी, त्यासाठीच मी आपली मुलाखत घेऊ इच्छितो.




कर्णिक : उत्तमच विचार आहे, पण मी त्यासाठी योग्य व्यक्ती ठरेन का, असा मला प्रश्न पडला आहे. मी त्यांच्या पुस्तकांचा चाहता आहे. एक बरा वाचक आहे, या व्यतिरिक्त माझा अधिकार शून्य आहे. त्यापेक्षा आपण एखाद्या अनुभवाची प्रचिती येणाऱ्या वा आलेल्या व्यक्तीची मुलाखत घ्यायला हवी. माझे केवळ शब्दज्ञानच असण्याची शक्यता आहे. शक्यता नव्हे, आहेच.

पाठक : आपले मत मला अनुभवाच्या पातळीवर मान्यच आहे, परंतु या मुलाखतीचा हेतू प्रकाशनाचे कार्य, संस्थेचे प्रकल्प, संस्थेने प्रकाशित केलेली विविध तऱ्हेची पुस्तके, त्यांची नियतकालिके, त्या मासिकांनी केलेले कार्य यांचा आढावा घेणे व तो सर्वांना कळणे हाच आहे.

कर्णिक : हा हेतू ठीक आहे. त्यावर बोलता येणे शक्य आहे.

पाठक : दुसरेही दोन हेतू ही मुलाखत घेण्यामागे आहेत. एक म्हणजे, यंदाच्या वर्षी, मराठी नियतकालिकांच्या परंपरेला १७५ वर्षे होत आहेत. बाळशास्त्री जांभेकरांनी १८३२ साली 'दर्पण' नावाचे एक मराठी नियतकालिक सुरु केले व ही परंपरा सुरु झाली. याच परंपरेमधील 'श्रीवामनराज' त्रैमासिक २५ वर्षांची वाटचाल करीत टिकून आहे. मराठीतील अनेक नियतकालिके बंद पडली असताना, एक नियतकालिक २५ वर्षे टिकून राहते, ही मराठी नियतकालिकांतील महत्त्वाची घटना मानायला हवी. दुसरे कारण असे की, मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा प्रथम खंड, जो ल. रा. पांगारकर यांनी प्रकाशित केला, तो १९३२ साली. या त्यांच्या प्रथम खंडाचाही अमृत महोत्सव यंदा आहे. पांगारकरांचा हा प्रथम खंड ज्ञानेश्वर-नामदेव कालखंडावरचा आहे. मराठी संत वाङ्मयाच्या दालनात श्रीवामनराज प्रकाशन संस्थेचे योगदान फार मोठे आहे, पण ते दुर्लक्षितच राहिले आहे. या दोन निमित्तांनी आमच्या वाचकांना या संस्थेची माहिती व्हावी व इतर अभ्यासकांनाही या माहितीचा उपयोग व्हावा, असा हेतू आहे.

कर्णिक : दोन्ही हेतू चांगले आहेत. मला प्रथम तुमचे अभिनंदन करायला हवे. कारण मराठीच्या परंपरेची आठवण, स्मरण 'दिशा' मासिकाने ठेवले. आजकाल इतके भान बाळगणारी व त्याप्रमाणे धडपड करून लेख, मुलाखती जमा करणारी संपादक मंडळी, विरळच आहेत. मी 'दिशा' मासिकाचा वाचक व लेखकही आहे. त्यामुळे आपली मेहनत, कष्ट मला ज्ञात आहेत. आपण वेळोवेळी हे भान दाखवले आहे. यंदा आपल्या 'दिशा' अंकालाही बारा वर्षे पूर्ण होत आहेत. खरंतर, कोणीतरी आपल्या कार्याचीही दखल घ्यायला हवी.

पाठक : ठीक आहे. आपल्यासारख्या अभ्यासू व्यक्तींना जाणीव आहे, यातच आम्हांला समाधान आहे. आपण आपले कार्य करीत पुढे जायचे इतके मी जाणतो. श्रेय, आठवण, कार्याची पोच मिळायची असेल तर मिळेल वा नाही मिळणार. असो, आता विषयाकडे वळतो. 'श्रीवामनराज प्रकाशन' संस्थेची काही पुस्तके मी सुद्धा स्वतः विकत घेतली आहेत, वाचलीही आहेत. 'श्रीवामनराज' त्रैमासिकाचा मी आजीव वर्गणीदारही आहे. उत्तम छपाई, देखणी मुखपृष्ठे आणि विलक्षण मंत्रमुग्ध करणारी भाषाशैली असा त्रिवेणी संगम म्हणजे श्रीवामनराजचे साहित्य आहे. प.पू.श्री. वामनराज गुळवणी महाराजांच्या स्मरणार्थ मराठीतील थोर संत, अभ्यासक, चिकित्सक-मर्मज्ञ अशा प.पू.श्री. मामासाहेब देशपांडे यांनी या संस्थेचे रोपटे लावले. श्री. मामांचे इतके मोठे कार्य असूनही मामा फारसे ज्ञात नाहीत. आपण श्री. मामांची प्रथम थोडक्यात ओळख करुन द्याल काय!

कर्णिक : जरूर, आणि कोणतीही सुरुवात खरे तर श्री. मामांच्याच स्मरणाने करायला हवी. श्रीज्ञानेश्वर माउलींनीच सांगून ठेवले आहे.

जयांचे केलिया स्मरण।<br>
होय सकल विद्यांचे अधिकरण।<br>
तेचि वंदू श्रीचरण । श्रीगुरुंचे॥

श्री.मामा हे महाराष्ट्रातल्या असंख्य लाखो जणांचे सद्गुरु होते. त्यांनी दाखवलेल्या

वाटेवरुन मार्गक्रमण करीत आणारे आजही असंख्य साधक आहेत. माझे दुर्दैव असे की, इतक्या थोर महात्म्याचे दर्शन होण्याचा योग माझ्या आयुष्यात नव्हता, पण या परंपरेच्या निकट येण्याचा योग मात्र आयुष्यात यावा यासारखे 'समर्थ' उपकार दुसरे कोणते असतील?

पाठक : एक विचारू का? आपल्या सहवासातील माझ्या निरिक्षणासुसार तुमचा पिंड, आध्यात्मिक वाङ्मयाकडे झुकणारा नव्हता. निरीश्वरवादाकडेच तुमचा ओढा होता. हे असे एकदम नव्वद डिग्रीत वळण कसे काय घेतलेत?

कर्णिक : माझेच मला माहीत नाही. मी इथे कसा आलो? मला उत्तर माहीत नाही. 'श्रीवामनराज' प्रकाशनाची पुस्तके वाचत गेलो आणि ओढलाच गेलो. मी निरीश्वरवादी होतो का? की तो एक धारण केलेला मुखवटा होता, तरुणपणातला? दु:ख, त्रास, कटकटी, प्रपंच्चामधील ऐहिक-भौतिक सुखांची अपेक्षा, शारीरिक क्लेश, आजारपण, अडचणी अशा असंख्य कारणांनी माणसे अध्यात्माकडे वळतात, पण यापैकी कोणतेही कारण माझ्यामागे नव्हते. आपसूक-सहज-जणू काय लिहूनच ठेवले असावे व त्यानुसार येणे व्हावे, तसा मला माझा हा प्रवास वाटतो व माझे मलाच आश्चर्य वाटते. अर्थात प.पू.सौ. शकाताईंनी असे म्हटले आहे की, 'माणसाने आपले कर्म शोधीत बसू नये'. मला त्यांचे हे वाक्य फार आवडते. उगाच कशाला चिवडत बसायचे? इथला माहोल, मनोव्यापार, कार्य चांगले वाटते ना बस, इतके पुरे नाही का?

पाठक : सॉरी, मधेच तुम्हाला अडवले. तुम्ही श्री. मामां विषयी सांगत होतात.

कर्णिक : हरकत नाही. पण माझे पुराण सांगण्यात मतलब काय? त्यामुळे ते आपण सोडून देऊ. असो. श्री. मामा म्हणजे खरं तर सर्वकाही होते. थोर आभ्यासक, उत्तम भाष्यकार, मर्मज्ञ टीकाकार, रसिक साहित्यिक, हृदयाला हेलावून टाकू शकणारे प्रवचनकार, अनुभवाची प्रचिती घेतलेले सम्राट, माउलींच्या शब्दाशब्दांचा प्रत्यय आणून देणारे ज्ञानराज, कवित्वाचे सारे गुण उपजत घेऊन आलेले शब्द प्रभू, साधकांना मार्गी लावणारे थोर कापडी, शुचित्व-शौच-सात्त्विकत्व पाळणारे, जपणारे थोर उपासक, शास्त्राचा मार्ग कदापि ढळू न देणारे शास्त्रप्रेमी साधक, आणि तरीही इतरांना मोकळीक देणारे प्रागतिक विचारांचे कुटुंब प्रमुख, शुद्ध तत्त्वज्ञानाचा-अध्यात्माचा प्रसार व प्रचार करणारे थोर प्रचारक, मातृप्रेमी, सद्गुरूंचे अनन्य शरणागत शिष्य, परंपरेचे सच्चे पाईक, दुसऱ्यांचे भले व्हावे यासाठी स्वत:चा देह सतत कष्टवत ठेवणारे भगवंतांचे दूत, आपल्यावर असलेली जबाबदारी समर्थपणे पेलणारे व शक्ती-युक्तीचा मार्ग सहज लीलया चोखाळू शकणारे सद्गुरु, अचूक वेध घेणारे भाष्यकार, शब्द, ज्ञान व औषधांचा सुयोग्यवेळी वापर करू शकणारे तन-मनाचे वैद्यराज, किती सांगू? आपली प्रतिभा लंगडी पडेल, पण त्यांचे स्वरूप सांगायचेच राहून जाईल.

श्री. मामा ज्ञानेश्वरी खरोखर जगले व इतरांनी

तो जगावी, किमान अनुभवाची वासाठी ते सतत प्रयत्नशील राहिले.

पाठक : 'ज्ञानेश्वरी' हा तर श्री. मामांच्या पंथाचा उपासना ग्रंथच होता ना? तो का?

कर्णिक : होय. ज्ञानेश्वरीचे अनेक अभ्यासक मी पाहिले, त्यांच्याविषयी खूप वाचले-ऐकले, पण श्री. मामांच्या इतका ज्ञानेश्वरीमय झालेला कोणीच दुसरा सापडणे कठीण आहे. ज्ञानेश्वरी कशी समजून घ्यावी? श्री. मामा म्हणत असत की, 'ज्ञानेश्वरीलाच शरण जाऊन ज्ञानेश्वरी समजून घ्यावयची असते. त्यासाठी लीनता हवी, श्रद्धा हवी, आतून आलेली शरणांगतता हवी. ज्ञानेश्वरी समजून येऊ शकते ती एकाच मार्गाने, तो मार्ग म्हणजे माउलींची कृपाच व्हायला हवी, तरच ते होऊ शकते.' म्हणजे अर्थातच तिथे उपासना आली. उपासना केल्याशिवाय काय प्राप्त होते? दुसरे असे की, ज्ञानेश्वरीतूनच तुम्ही योग्य मार्गाला लागू शकता.

पाठक : योग्य मार्ग म्हणजे?

कर्णिक : माउलींनी ज्ञानेश्वरीत सांगितलेला 'पंथराज' हाच महत्त्वाचा मार्ग आहे, पण तो ज्यांना खरा समजतो तोच या मार्गाने वाटचाल करू शकतो. हा मार्ग आपला आपल्याला सापडतो का? तर नाही. त्यासाठी मार्ग दाखवणाराच कोणीतरी भेटायला लागतो. तो भेटला आणि त्याने या वाटेवर जर आणून ठेवले, तरच प्रवास सुरू होतो. पण हे कळायला ज्ञानेश्वरीतला सहावा अध्याय समजायला हवा. तो समजण्यासाठी त्या अध्यायाचे धागे-दोरे, जे इतर अध्यायातील ओव्यांशी जोडले गेले आहेत, ते माहीत व्हायला हवेत. असे ते सारे गहन होत जाते.

पाठक : श्री वामनराज प्रकाशनाची पुस्तके वाचली की त्यात असे दिसून येते की, सहाव्या अध्यायावरच या प्रकाशनांचा प्रमुख भर आहे. त्यातली प्रमुख पुस्तके कोणती?

कर्णिक : प्रमुख अशी सर्वच पुस्तके आहेत, पण प्रत्येक पुस्तकाचा एक महत्त्वाचा केंद्र बिंदू आहे, तो ज्याला समजला, त्याला श्री. मामांच्या तत्त्वज्ञानाचा गाभाच समजला असे म्हणता येईल. पण सहाव्या अध्यायावर जास्त भर आहे हे आपले निरीक्षण मात्र योग्यच आहे. स्वत: श्री. मामांची 'तो अध्याय सहावा', 'येईजे पश्चिमेचिया ारा', 'अभ्यासाचे आपणयाते करीं', 'बुद्धीची फुलिका विरे', 'हा अवधारी पंथराजु' आणि 'मुद्रेची प्रौढी ऐसी' ही सहा पुस्तके खास सहाव्या अध्यायाचे विवेचन करणारी आहेत. 'करूनि सद्गुरू स्मरण अनुभविजे' हे प.पू. सौ. ताईंचे पुस्तक, 'जो संती वसविला ठावो' हे प.पू.श्री. दादांचे पुस्तक, 'तैं शरीरभाव आटती', 'होआवे आसन ऐसे', 'जयांचे केलिया स्मरण', 'विषयांचा विसरू पडे', 'अभ्यासाची पाखर पडे' अशी इतरही श्री. दादांची पुस्तके सहाव्या अध्यायावर म्हणजेच अभ्यास योगावरची आहेत.

पाठक : आताच तुम्ही प्रत्येक पुस्तकाच्या केंद्रबिंदूचा उल्लेख केलात. तो केंद्रबिंदू कोणता?

कर्णिक : त्यासाठी सहाव्या अध्यायावरचे विवेचन नीट सांगायला हवे. तोच तर मुळी ज्ञानेश्वरीचा गाभा आहे. आणि ते गहन तर आहेच पण गुढ-निगुढ व योगपर आहे. श्री. मामा,

श्री. ज्ञानेश्वर महाराजांनी जे सहाव्या अध्यायाचे जे मर्म सांगितले आहे. ते छान मांडत असत. ते त्यांच्या पुस्तकातही आले आहे. सहाव्या अध्यायाचे मर्म आहे उपोद्घात माउलींनी दुसऱ्या अध्यायापासून केला आहे. बुद्धियोग म्हणून जो म्हणतात, त्याचेच मर्म पुढे तिसऱ्या, चौथ्या व पाचव्या अध्यायात थोडक्यात सांगितले, व सहाव्या अध्यायात विस्ताराने सांगितले आहे.'

सहावा अध्याय हा कुंडलिनी शक्तीच्या जागृतीच्या मार्गाचा आहे. ही कुंडलिनी शक्ती परंपरेचा अधिकार असणारी व्यक्तीच जागृत करू शकते. सद्गुरुंशिवाय हे कार्य होऊ शकत नाही. असे सद्गुरू भेटणे व 'तरी गुरु दाविलिया वाटा' असा अभ्यास केला, तरच त्या मार्गावरुन चालणे होते. असे सद्गुरु भेटणे हे केवळ तुमच्या पूर्वपुण्याईवर अवलंबून असते. त्यांच्या कृपेनेच ही शक्ती जागृत होते व मार्ग व सुरु होतो. शक्तिपात दीक्षेने जो होतो तो सहजयोग.

पाठक : पण हेच सारे योगशास्त्राचा अभ्यास केल्यानेही प्राप्त होते.

कर्णिक : होते. पण एका विशिष्ट पातळीपर्यंतच! शिवाय खुद्द श्री. ज्ञानेश्वरांनीच हा योगाचा मार्ग किती खडतर आहे, याचेही वर्णन करून ठेवले आहे. यम, नियम, शारीरिक कष्ट, तप, ताप, करून साध्य होईलच असे ते नाही. जरा चूक झाली की ते सर्व जिथल्या तिथेच राहते. यापेक्षा माउलीच ज्या मार्गाचा पुरस्कार करतात तोच संसारी माणसांना श्रेयस्कर!

पाठक : हे सारे आकलनापलीकडचे वाटते, माफ करा, कठीण वाटते.

कर्णिक : कठीण आहेच. अनुभवाचाच प्रांत असल्याने, शब्दज्ञानाचा इथे काहीच उपयोग नाही. मलाही अनुभव नाहीच, सारीच पोकळ बडबड, पण काहीतरी आहे, जे योग्य मार्गदर्शक भेटले तर सापडू शकते. सद्गुरुंशिवाय शक्य नाही. माउलींनीही तेच म्हटले आहे.

ते बुद्धीही आकळितां सांकडें।
म्हणऊनि बोली विपाये सांपडे।
परी श्रीनिवृत्ति कृपादीप उजियेडे । देखेन मी ॥

यावर श्री. मामांचे विवेचन असे की, 'माउली असे सांगतात की, आता जे मी तुम्हांला सांगणार आहे, ते अतिशय कठीण आहे. बुद्धीला आकलन करताना हे कठीण वाटणारच, परंतु ते सांगताना तुम्हाला समजेल असेच मी सांगेन म्हणतो. याचे कारण एकच की, माझे सद्गुरू श्रीनिवृत्तिनाथ महाराज यांची माझ्यावर जी कृपा आहे, त्याच कृपादीपामुळे मी पाहीन. कसे? तर रात्र संपल्यावर सूर्योदय होताच सर्वत्र प्रकाश पडतो, तसे मला कृपादीपाच्या योगाने आत्मवस्तू दिसते. ती जशी दिसते, तशीच मी सांगेन, मात्र ती किती कठीण आहे? तर

जे दिठीही न पविजे । ते दिठीवीण देखिजे।
जरी अतींद्रिय लाहिजे । ज्ञानबळ ॥

जी वस्तू दृष्टिपथात येत नाही, ती मी तुम्हांस दाखवीन. मात्र तुम्हा सर्वांना अतींद्रियास ज्ञानबळाची जोड मिळवता आली तरच ती दिसेल, समजेल. यासाठीच माउलींनी सहाव्या अध्यायाची मांडणी केली आहे, असे

श्री. मामा समजावून देतात. श्री. मामा आणि त्यांची सर्व परंपरा श्रीमाउलींचा अभिप्रेत असणारा अर्थ अधिक सोपा करून सांगते. तो वाचल्यावर नवल तर वाटतेच, पण वाचक अंतर्मुख होतो.

पाठक : याचे उदाहरण देता येईल का?

कर्णिक : पुस्तकात अशी उदाहरणे ठायी ठायी सापडतील. पण एखादे सांगतो. श्री ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात

येणे यमनियमाचेनि तळवटे।
रिगें आसनाचिये पाउलवाटे।
येई प्राणायामाचेनि आडकाठे ।
वरौता गा ॥६.३.५५

अशी एक ओवी आहे. यातील 'यमनियम' समजावून देण्याची श्रीमामांची हातोटी अप्रतिम आहे. यम म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह असे पाच यम आहेत. त्या प्रत्येकाचे विश्लेषण मामा करतात. नुसते विश्लेषण करीत नाहीत, तर त्या संदर्भात श्रीज्ञानेश्वर महाराज श्रीज्ञानेश्वरीत त्याविषयी काय भाष्य करतात, त्याचे ते दाखले देतात. उदा. 'अहिंसा' यावर बोलताना अहिंसेची ज्ञानेश्वरांनी केलेली व्याख्याच प्रथम मांडतात.

आणि जगाचिया सुखोद्देशें ।
शरीरवाचामानसे । राहाटणें ते अहिंसे।
रूपजाण। १६.२.११४

जगाला सुख होईल यादृष्टीने, नुसत्या शरीराने न वागता, मनापासून त्यास सुख व्हावे असे वागणे, म्हणजेच खरी अहिंसा असे माउलींना अहिंसेबाबत सांगायचे आहे. याबरोबरच मामा इतर संतवचनेही देतात. असे करत करत श्रीमामा प्रत्येक 'यम' समजावतात. मग 'नियमा' कडे येतात. तेही पुन्हा पाच. शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान. त्यांचीही मांडणी तीच व तशीच. इतके करून मामा थांबत नाहीत तर, दुसरी एक मतप्रणाली यम दहा व नियमही दहा मानतात. मामा याचेही मर्म विशद करतात. मग पुढच्या विवेचनाकडे येतात. पुढच्या विवेचनात 'रिगे आसनाचिये पाउलवाटे' यावर भाष्य करताना, 'आसन म्हणजे काय?' याच मूलभूत शब्दावरून प्राणायाम, प्राणायामाची आवश्यकता इत्यादी अनेक बाबी विशद करत जातात.

थोडक्यात सांगायचे तर ज्ञानेश्वरीतील प्रत्येक शब्दा शब्दाच्या मागे असणारे संदर्भ मामा असे काही उलगडून दाखवतात की, ती एका प्रकारची 'हायर क्रिटिसिझम' चीच पद्धती वाटत राहते. मला तर मामांचे वाङमय वाचताना इतके नवे नवे विषय खुणावत राहतात की त्याला अंतच नाही.

पाठक : त्यातील काही विषय सांगितले तर बरे होईल?

कर्णिक : उदाहरणार्थ, 'श्रीमामांची श्रीज्ञानेश्वरी विषयक हायर क्रिटिसिझम' किंवा 'श्रीमामांची शैली' अथवा 'श्रीमामा, त्यांच्या मातोश्री आणि श्रीज्ञानेश्वरी' वा 'श्रीमामांची संदर्भ दाखले देण्याची पद्धती' असे अनेकच.

पाठक : आपण आता मामांच्या मातोश्रींचा उल्लेख केलात, मामांना ज्ञानेश्वरीचे शिक्षण त्यांच्या मातोश्रींकडून मिळाले होते. या संदर्भात काही सांगावे.

कर्णिक: होय. तोही एका दीर्घ लेखाचा विषय आहे. मामांनी ज्या ज्या वेळी ज्ञानेश्वरीवर प्रवचने दिली, त्या त्यावेळी त्यांनी याचे विवेचन करून ठेवले आहे. अशा मातोश्री मिळणे यासाठी फार मोठे भाग्य लागते आणि असा अलौकिक पुत्र लाभणे हे त्याहीपेक्षा परमभाग्याचे लक्षण असते. वेळोवेळी लहानपणी मामा आपल्या मातोश्रींना ज्ञानेश्वरीविषयक शंका विचारीत व त्या त्यांच्या सोप्या, अगदी घरगुती उदाहरणांनी, त्या शंकेचे निरसन करीत. मामांना ज्ञानेश्वरीच्या गूढार्थाचे पहिले धडे त्यांच्या मातोश्रींनीच दिले. ते सारे दाखले वाचले की अचंबित व्हायला होते.

पाठक : एखादा दाखला सांगता का?

कर्णिक: ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात एक ओवी आहे.

तव वरिलेकडोनि ढाले । चंद्रामृताचें तळें।
कानवडोनी मिळे । शक्तिमुखी ॥ ६.१४.२४७

यातील 'तंव', 'चंद्रामृताचे तळे' यांचा अतिशय सुंदर अर्थ सांगितल्यावर मामा जेव्हा 'कानवडोनी' या शब्दावर येतात तेव्हा त्यांना आईने त्याचा विशद करून सांगितलेल्या अर्थाची आठवण होते व ते तो अर्थ सांगतात.

'माझे वडील हयात असे पर्यंत आमच्याकडे साधुसंतांचे नेहमीच आगमन व्हायचे. त्यामुळे प्रसादाच्या पंक्तीचा लाभही नेहमी मिळायचा. त्या पंक्तीत आमटी वाढण्यासाठी एक भांडे असायचे, त्याचे नाव कावळा. ह्या कावळ्याचे उदाहरण देऊन आई मला विचारायची की, 'या कावळ्यास हातात धरण्यासाठी कडी आहे ना?' मी 'हो' म्हटल्यावर मग तिने मला त्यात पाणी भरून आणावयास सांगितले. मी ते भरून आणल्यावर, तिने हळूच ते किंचित वाकडे केले, तो त्याच्या चोचीवाटे एक थेंब खाली पडला. ते पाहून ती म्हणाली की, 'अशी कल्पना कर की या कावळ्यास खालून अखंड पाणी येण्याची सोय आहे. अर्थात एक थेंब पडला की त्यात खालून एक थेंब भरतो आहे. याचाच अर्थ अव्याहत चोच चालू आहे. त्यासाठीच या ओवीत 'कानवडोनी' म्हणजे तिथे वाकडे करून, हा शब्द वापरला आहे!'

पाठक : वा! सुरेख! इतकं सोपं करून सांगणं एकूणच कठीण असतं. मामा खरोखरच भाग्यवान होते की त्यांना असे सुरेख शिक्षण मिळालं.

कर्णिक : ते तर आहेच. त्यांचा सारा अभ्यास मातोश्रींच्या भक्कम शिक्षणावर उभा होता, पण त्यावरोबरच मामांचे कष्टही काही कमी नव्हते. त्याचे एक उदाहरण देतो. मामा तेव्हा सरकारी नोकरीत होते. घरातून ते नोकरीवर सायकलने जात असत. त्यांनी आपल्या सायकलला पुढे हँडलजवळ एक कॅरियर लावून घेतले होते. रोज कामावर जाताना आणि येताना, ते मोठ्या अक्षरात ज्ञानेश्वरीतील काही ओव्या लिहून घेत व त्या ओव्यांचा पुठ्ठा कॅरियरवर लावत आणि जाताना-येताना, त्या ओव्या पाठ करत व त्यावर ते चिंतन करीत असत. चिंतनाची शिकवणही मामांना त्यांच्या मातोश्रींनीच घालून दिली होती.

पाठक : ती कोणती?

कर्णिक : मातोश्रींनी त्यांनी सांगितले होते की रोज शंभर ओव्या वाचायच्या. असे वाचून बरेच वेळा झाले की, शंभर ओव्यांना जितका वेळ लागत असेल, तितक्या वेळेत फक्त दहाच ओव्या वाचायच्या व त्यावर चिंतन करायचे. ते झाले की, त्याच वेळेत फक्त एकच ओवी वाचायची व त्यावर चिंतन करायचे. मामांनी ज्ञानेश्वरीचा अभ्यास हा असा केलाय. त्यांच्यावर माउलींची पूर्ण कृपा तर होतीच, पण त्यांचे कष्ट, चिंतन आणि मातोश्रींची प्रेरणा व शिकवणही त्यामागे होती हे विसरून चालणार नाही.

पाठक : मामांच्या आयुष्यांविषयी थोडे सांगा ना.

कर्णिक : त्यांचे चरित्रच उपलब्ध आहे. त्यात त्यांचा आयुष्यपट, कार्य, प्रणाली, विचारधारा, तप, खडतर प्रवास, सारे आले आहे. पण मामा हे थोर स्वातंत्र्यसेनानी होते हे फारसे ज्ञात नाही. यशवंतराव चव्हणांचे ते सहकारी होते. त्यांच्या बरोबर त्यांनी तुरुंगवास भोगलाय. चपळाईने गोळ्या चुकवल्या आहेत. राजकोटला असताना त्यांनी योगशास्त्राचे संपूर्ण धडे घेतले आहेत. 'पढ्री' वारी बारा वर्षे केली आणि हयात भर ते वारीला दरवेळी न चुकता जात असत. थोर सद्गुरू श्री. गुळवणी महाराजांनी त्यांना त्यांच्या ह्यातीतच शक्तिपात दीक्षेचे अधिकार दिले होते. मामांनी त्याचा वापर अत्यंत अचूक केला व अनेकांना उद्धरले आहे. पण त्यांचा मोठा विशेष असा की, श्री ज्ञानेश्वरी आणि शक्तिपात दीक्षा याचे मर्म त्यांनी अचूक हेरले. त्यांना ते ज्ञानेश्वरीतच सापडले व त्यांनी त्यासाठी आयुष्यभर प्रसार केला. ते नेहमी म्हणत. ज्ञानेश्वरी ही निष्काम हेतू ठेवूनच वाचली पाहिजे तरच कृपा होते.

पाठक : ज्ञानेश्वरी आणि शक्तिपात दीक्षा याचे नेमके नाते कसे आहे? श्री ज्ञानेश्वर महाराज त्याविषयी काय म्हणतात?

कर्णिक : मला याचा अनुभव नाही, अभ्यास तर त्याहून नाही. श्री. मामा, श्री. दादा यांच्या पुस्तकांतून जे आले आहे, तेच मी सांगू शकतो. श्री. ज्ञानेश्वर महाराजांनी 'दीक्षे'ची सुंदर व्याख्या केली आहे, 'दीक्षारहस्य' या पुस्तकात ती मी वाचली आहे, तीच सांगतो.

हृदयाहृदय येक जालें ।
ये हृदयींचे ते हृदयी घातले ।
द्वैत न मोडिता केलें।आपणाऐसे अर्जुना ॥
१८.६६.१४२१

ज्या परमात्मास्वरूप प्राप्तीच्या प्रक्रियेत श्रीगुरुंच्या हृदयातून ज्ञान व क्रियाशक्तीचे संक्रमण शिष्यहृदयात होते आणि देहाचे द्वैत शिल्लक असतानाही द्वैतालाही अद्वैताची अनुभूती येते, तिलाच दीक्षा असे म्हणतात. आणखीही एक दाखला आहे.

पिंडे पिंडाचा ग्रासु ।
तो हा नाथसंकेतींचा दंशु ।
परि दाऊनी गेला उद्देशु ।
श्रीमहाविष्णु ॥ ६.१४.२९१

पिंडे म्हणजेच पांच भौतिक देहात, पिंडाचा म्हणजे वासनादेहाचा, पिंडाने म्हणजे भगवती शक्तीने, ग्रास करण्याची म्हणजे वेध करण्याची, जी पद्धती आहे, तीच नाथसंप्रदायाचे गुप्त मर्म असलेली शांभवी विद्येची दीक्षा-पद्धती आहे.

श्री ज्ञानेश्वरांनी याच दीक्षा-पद्धतीला 'अधियज्ञ' म्हणूनही म्हटले आहे.

आतां इयेचि शरीरग्रामीं ।
जो शरीरभावातें उपशमी
तो अधियज्ञु एथ गा मी । पंडुकुमरा ॥ ८.४.३७

याच शरीरात सद्गुरू शक्तीच्या सहाय्याने शरीरभावांना उपशम करण्याची पद्धती म्हणजेच अधियज्ञ. हीच दीक्षा होय.

पाठक : छान! ज्ञानेश्वरीचे असे विवेचन, असा लावून दाखवलेला अर्थ माझ्यातरी वाचनात नाही. राग मानू नका, पण या शक्तिपात दीक्षेवर काहींचा विश्वास नाही. मला आश्चर्य वाटले ते विनोबांचेही. त्यांनीही या परंपरेला उचलून धरलेले नाही. विशेष म्हणजे टिळकांच्या गीतारहस्यातही यावर विवेचन नाही.

कर्णिक : राग येण्याचा प्रश्नच नाही. हा सारा अनुभूतीचा प्रांत आहे. ज्याला तो प्राप्त होतो त्यालाच अनुभवता येणार. इतरांना तो कसा समजणार? आपल्याला अनुभव नाही, म्हणून तो प्रांतच नाकारणे योग्य ठरणार नाही. फारफार तर मला त्याचा अनुभव नाही इतकेच अनुनभवी माणूस म्हणू शकतो. मला तुमच्या मनातले विचार कळत नाहीत, दृश्यरूपात ते तुम्हाला दाखवता येत नाहीत, म्हणून तुम्हाला विचारच नाहीत, असे मी म्हणू शकणार आहे का? साऱ्या मराठी आणि भारतीय संतांनी जिथे याचे दाखले दिले आहेत ते काय उगाच का? त्यांना खोटे काहीतरी मांडून ठेवायचे होते का? त्यांनी जे अनुभवले ते त्यांनी मांडले. घ्यायचे असेल तर घ्या. त्यांचा आग्रह नाही, पण खऱ्या कळकळीने त्यांनी ते सांगायचा प्रयत्न केलाय. तो समजण्याला सुद्धा पुण्याई लागते. नाकरण्याचा जसा हक्क आहे तसाच तो स्वीकारण्याचाही आहे. जे कोणी हा मार्ग मानतात, त्यांना त्यांच्या वाटेने जाऊ द्यावे. उगाच बुद्धिभेद, टीका, कुत्सितपणा करण्याची गरज नाही. 'आम्हाला पटत नाही' या मतात अहंकाराशिवाय दुसरे काहीच नाही. अनुभव घ्यावा, मग बोलावे. त्याशिवाय व्यर्थ आहे. श्रीज्ञानेश्वरीत असे असंख्य दाखले आहेत की ते जर समजले तर माणसाचा उद्धारच होईल. पण ते लक्षात यायला हवे ना!

विनोबांनी चमत्कारावर बोलताना जाता जाता हा उल्लेख केलाय. त्याबाबत त्यांचे नेमके मत काय होते, ते नीट शोधायला हवे, पण टिळकांचा दृष्टिकोन वेगळा होता. त्यांनी श्री ज्ञानेश्वरीतील अत्यंत अल्प उदाहरणे दिली आहेत, त्यावरुनच हे लक्षात येते की, ज्ञानेश्वरीचा त्यांनी अशा अंगाने विचार केलेला नव्हता. मग त्यांचा दाखला कसा मानायचा? तो ग्रंथ महान आहे पण विवेचनाचा त्यांचा मार्ग भिन्न आहे.

पाठक : असो. वाद घालायचा माझा इरादा नव्हता, तर एक वेगळी भूमिका मांडायचा होता. ज्याला जे पटेल, रुचेल, अनुभवाला येईल ते त्याने स्वीकारावे हेच खरे म्हणजे सत्य असते. तुम्ही 'दिशा'साठी इतका वेळ दिलात याबद्दल तुमचे 'दिशा' तर्फे आभार मानतो. धन्यवाद!

डॉ. प्रदीप कर्णिक

मुलाखत प्रा. मोहन पाठक, ठाणे.

...

# आमची चीन यात्रा...

*चीनमधील आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात आमच्या आनंदीबाई जोशी विद्यालयमधील विद्यार्थ्यांचा प्रकल्प समाविष्ट होता. या निमित्ताने चीनमधील या प्रदर्शनासंबंधातील लेखाचा पुढील भाग. -संपादक*

दि. ४ ऑगस्ट २००७ हा दिवस आमच्या ए.के.जोशी शाळेच्या इतिहासात सुवर्णाक्षरात नोंद करणारा ठरला! चीनमधील 22nd CASTIC मध्ये सहभागी झालेल्या सर्व परदेशी प्रकल्पांसाठी चिनी सरकारने वेगळी स्पर्धा ठेवली होती; व त्यात भारताची 'Outstanding Performance' म्हणून निवड झाली होती. कुनमिंग इथे चाललेल्या बक्षिससमारंभात या निवडीची घोषणा झाली. बराच काळ आतुरतेने वाट बघत असलेले आमचे विद्यार्थी (मनाने आम्ही सगळेच) धावतच स्टेजवर पोचले. क्षणभर आमच्या समोरचं दृष्य धूसर झालं पण लगेच स्वतःला सावरलं, मुलांसाठी टाळ्या वाजवण्याचं भान आलं. डोळ्यांसमोर आमच्या कोल्हटकर मॅडम आणि ए.के. जोशी शाळेचा अवघा परिवार उभा राहिला. मनातल्या मनात सर्वांना एक सॅल्युट ठोकला. माझ्या बरोबर असलेल्या विज्ञान शिक्षिका पूर्णिमा साठेचं अभिनंदन केलं. ए.के. जोशी शाळेच्या शिरपेचात आणखी एक लखलखित तुरा खोवला गेला. आमच्या चीन यात्रेची खरी सार्थकता त्या यशात सामावलेली होती!

२८ जुले २००७ ला रात्री ११.२५ वाजता सुरू झालेल्या आमच्या चीन यात्रेची सांगता ६ ऑगस्टला २००७च्या रात्री ९.३० वाजता छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळावर झाली.

या प्रदर्शनाच्या निमित्ताने चीनमधील कुनमिंग शहर व त्याच्या आजूबाजूच्या काही प्रसिद्ध ठिकाणांचं दर्शन होणं हा आमच्या आयुष्यातील एक अत्यंत दुर्मिळ योग होता.

आयोजकांनी देखील प्रदर्शनाच्या वेळे व्यतिरिक्तच्या काळात आम्हा सर्व परदेशी पाहुण्यांना जास्तीत जास्त 'कुनमिंग दर्शन' घडविण्याची चोख व्यवस्था केली होती. कुनमिंग हे शहर युनान प्रांताची राजधानी म्हणून जितकं ओळखलं जातं, तितकंच ते Spring City म्हणूनही प्रसिद्ध आहे. ४०० वर्षांचा इतिहास असलेल्या या शहरातील फुलांच्या बागा, सुखद हवामान आणि निसर्गरम्य परिसर या सर्वांमुळे पर्यटकांचं हे आवडतं ठिकाण आहे. माओच्या काळात चीनमधील सम्राटशाही नेस्तनाबूत करण्यात आली होती; तिच्या सर्व खाणाखुणाही नष्ट करण्यात आल्या होत्या. आपल्याला खूप पुरातन वास्तू वगैरे पहायला मिळतील ही आशाच नव्हती. तरीही चीन सरकारचं कौतुक वाटतं की, गेल्या १५ ते २० वर्षांत त्यांनी अक्षरशः कात टाकून नव्याने जगासमोर यायचा निश्चय केला आहे. त्यासाठीच्या प्रयत्नांना तोड नाही. मागच्या तोडफोडीतून वाचलेल्या काही इमारती डागडुजी करून पर्यटकांसाठी खुल्या केलेल्या आहेत.

पर्यटनस्थळी जाताना आमच्याबरोबर इंग्रजी बोलणारा गाईड असायचा. सुरुवातीला 'चायनीज इंग्लिश' बरंचसं डोक्यावरून जायचं. पण नंतर नंतर मात्र आमचे कान त्याच्या इंग्रजीला सरावले. 'थ' च्या जागी 'स' ऐकताना खूप गंमत वाटत होती. आमच्या तोंडी नंतर नकळत 'थँक्यू' ऐवजी 'सँक्यू' 'थाऊजंड' ऐवजी 'साऊजंड' असे उच्चार यायला लागले.

'डियान्ची' या प्रसिद्ध तळ्याकाठी एक खास चिनी वास्तुकलेचा नमुना असलेली इमारत उभी होती. तिच्या दर्शनी भागात दोन मोठे खांब होते. त्यावर 'कपलेट' हा काव्यप्रकार अगम्य चिनी भाषेत कोरलेला होता. एका खांबावर तिथल्या निसर्गाचे वर्णन होते तर दुसऱ्या खांबावर तेथील काही ऐतिहासिक घटनांची नोंद केलेली होती. त्यात

या 'डियान्ची लेक' च्या निर्मितीचीही नोंद होती. खूप मोठं तळं एका सम्राटाने त्याच्या लष्करात navy Unit सुरु करायचं होतं म्हणून निर्माण केलं होतं. तळ्याचा विस्तार पाहून खरचं स्मिमित व्हायला झालं. एका छोट्या तळ्यात कमळांची हिरवीगार पानं आणि थोडीशीच कमळं दिसत होती. नजर वेधून घेणारे फुलांचे ताटवे, बोन्साय केलेली अनेक झाडं, अशा कितीतरी गोष्टी आम्हाला आमच्या कॅमेऱ्यातही टिपायच्या होत्या. पण रीचर्डला (गाईड) सारखी पुढे पुढे पळायची घाई! तरी डॉ. आगरकर वारंवार त्याच्या पळापळीला ब्रेक लावून त्याला थांबवून ठेवायचे.

साधारण मार्च महिन्यात डॉ. मीना प्रभू यांचे 'चिनी माती' हे पुस्तक माझ्या वाचनात आलं होतं. त्यातील अश्मारण्याचं (Stone Forest) वर्णन वाचताना अनेक ठिकाणी निसर्गाच्या चमत्काराने मन थक्क होत होतं. त्यावेळी स्वप्नातही विचार केला नव्हता की निसर्गाचं हे आक्रित आपण 'याचि देहा याचि डोळा' पाहू! यासाठी कारणीभूत असलेल्या सर्वांना मनापासून धन्यवाद!

हजारो वर्षांपूर्वी झालेल्या भूकंपातील उत्पातात भूगर्भातील खडक जमिनीवर येऊन तशाच वेड्यावाकड्या अवस्थेत वर्षानुवर्षे उभे आहेत. यात ठिकठिकाणी गुहा, तळी निर्माण झाली आहेत. अक्षरशः वृक्षांच्या अरण्यासारखं हेही एक निबीड अश्मारण्य होतं. काळाच्या ओघात प्रचंड शिळांना वेगवेगळे आकार प्राप्त झाले होते. एका ठिकाणी दोन मोठ्या शिळांवर एक छोटीशी आडवी शिळा अशी काही लटकत होती की आता पडेल की काय अशी भीती वाटत होती. स्टोन फॉरेस्टच्या या परिसरात बऱ्याच आदिवासी जमातींच्या वसाहती आहेत. पारंपरिक वेशातील त्यांची नृत्ये सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. सर्व पायवाटांवर फरशा घातलेल्या होत्या. दोन अडीच मैलांची पायपीट केल्यावर धापा टाकीत बाहेर आलो. तेव्हा समजलं, की आपण निम्मंसुद्धा अश्मारण्य पाहिलेलं नाही. मात्र जे काही पाहिलं, अनुभवलं ते मात्र अविस्मरणीय होतं!

चीन यात्रेत आणखी एक विलक्षण अनुभव देणारं ठिकाण म्हणजे Znagkoudng Cave! याचा उच्चार शब्दांकित करणं मला अजूनही जमत नाहीए. एक पर्वताखालून (भूमिगत) वाहणाऱ्या नदीच्या काठाने तिच्याबरोबर प्रवास करणाऱ्या एक वेगळाच थरार आम्ही अनुभवला. मानवनिर्मित बोगद्यातून गाडीत बसून प्रवास करणं वेगळं आणि दोन डोंगरांमधील खोल व अतिशय चिंचोळ्या दरीतून उसळणाऱ्या, फेसाळत वाहणाऱ्या नदीच्या बाजूबाजूने काही फुटांच्या अंतरावर बांधलेल्या कठड्यांमधून चालणं वेगळं!

नदी डोंगर पोखरून स्वतःची वाट शोधत वर्षानुवर्ष वाहते आहे. काही ठिकाणी ती रुंद होते, काही ठिकाणी कड्यांवरून धबधब्याच्या रूपात कोसळते, तर कुठे कुठे ती संथ होते. तिची सर्वच रूपं विलक्षण होती. चिनी सरकारने मात्र पर्यटकांच्या सुरक्षिततेची जास्तीत जास्त काळजी घेतली होती. जागोजागी रंगीबेरंगी दिवे लावलेले होते. सर्वात कमाल म्हणजे त्या डोंगरांच्या पोकळ भागात जिथे सपाटी होती तिथेही पर्यटकांच्या मनोरंजनासाठी नृत्यं चालली होती. दगडांचे नमुने, दीडशे वर्षांपूर्वीचं भलंमोठं मशरूम यांचं प्रदर्शन होतं. खडकांनी विविध आकार धारण केलेले होते. भूगर्भशास्त्रज्ञांना अभ्यासासाठी हे एक उत्तम ठिकाण आहे. दीड दोन तासांनी खूप पायऱ्या चढून बाहेर आलो तेव्हा मनात त्या जादुई नगरातून सुटल्याचाच भाव जास्त होता.

कुनमिंगमधील एक छोटंसं म्युझियम पाहिलं आणि आपल्याकडच्या संपन्न म्युझियम्सची आठवण झाली. सर्व पुरातन वस्तू, खाणाखुणा नष्ट झालेल्या त्या भागात म्युझियममध्ये ठेवायला जे काही मिळालं होतं ते फारचं मोडकळीस आलेलं होतं. जुनी शस्त्रे, दागिन्यांच्या पेट्यांवरील धातुंचे शिल्पकाम, शिरस्त्राणं यांचे काही नमुने तिथं होते. दर्शनीय भागातील १५ ते २० फूट उंचीचा एक कोरीव खांब सर्वांचं लक्ष वेधून घेत होता. 'डाली' सम्राटांच्या राजवटीत तो उभारलेला होता आणि त्यावर

बौद्ध सूत्र कोरलेली होती. काही उत्तम शिल्पाकृतीही या खांबांवर होत्या. या म्युझियममधील सर्वात प्रेक्षणीय भाग म्हणजे, चीनमध्ये मिळालेले डायनॉसोरचे सांगाडे! आतापर्यंत फक्त चित्रांत पाहिलेले हे सांगाडे प्रत्यक्ष बघताना मात्र छाती दडपून गेली! या महाकाय प्राण्यांचं अस्तित्व एकेकाळी चीनच्या काही भागात होतं.

उंच डोंगरांवरील काही देवळांचं दर्शन आम्हाला झालं. पण ही देवळं आता फक्त प्रेक्षणीय स्थळं म्हणूनच अस्तित्वात आहेत. तिथे धार्मिकता अजिबात नव्हती. चीन हे निधर्मी राष्ट्र आहे. गाईडने सांगितलेल्या देवांच्या अख्यायिका मात्र गंमतीशीर होत्या आणि आपल्याकडच्या आख्यायिकांशी त्या बऱ्याच मिळत्याजुळत्या होत्या. पृथ्वीवर कुठेही जा मनुष्यस्वभाव सारखाच! तेव्हा त्यानेच निर्मिलेल्या गोष्टीही सारख्या असणं अपरिहार्यच होतं.

सर्व देवळांमध्ये मुख्य देव व त्याच्या दोन्ही बाजूला संरक्षक देव दिसत होते. एक देव होता तो आपल्या कुबेराचाच अवतार होता. त्याची प्रार्थना केली की भरपूर संपत्ती प्राप्त होते. एका देवळाबाहेरील शिल्पात कासवाला विळखा घातलेला सर्प दाखवला होता. पण ते शिल्प मैत्रीचं प्रतीक होतं. त्याची प्रार्थना केल्यास दीर्घायुष्य लाभतं. प्रेमिकांचाही एक देव (Lovers God) होता. त्याची प्रार्थना केली तर मनात असलेला जोडीदार मिळतो. अशा गंमतीदार कथा रीचर्ड आम्हाला गंभीर चेहऱ्यानं सांगायचा. कोणी हसलं नाही तर ' It was a joke!' असं म्हणून स्वतःच केविलवाणा हसायचा.

कुनमिंगशहरापासून ६० किमी. अंतरावर असलेल्या 'सीनचॅन' लेक पहायला जाताना साधारण निम्म्या अंतरावर गेल्यावर बसमध्ये काहीतरी बिघाड झाला. चीनमध्ये उतरल्यापासून आमच्यासाठी फिरायला फारच प्रशस्त व आरामदायी बसेस ठेवलेल्या होत्या. पण शेवटी मशिनच ते! पण आश्चर्य असं की आयोजकांनी फोनाफोनी करून अवघ्या दहा मिनिटात दुसरी बस हजर केली. या गाडीत बसल्यावर जाणवलं की ही आपल्या एस्.टी. बसचीच बहीण आहे! रस्ते चांगले होते तरी उडायला होत होतं (कारण गाडीच खिळखिळी झालेली होती. कार्टूनमध्ये दाखवतात, तशी सर्व बाजूंनी कोसळेल की काय अशी धास्ती वाटत होती. पुलंच्या अंतु बर्व्यांची आठवण झाली. आम्हीही उतरल्यावर बहुतेक हाडांचा हिशोब जुळवणार होतो. पण त्याआधीच बसने शेवटचा आचका देऊन राम म्हटला. मी. पेंग झीं चा (प्रमुख आयोजक) चेहरा ओशाळल्यासारखा झाला. त्यांना काय माहीत की, असं काही झालं नसतं तर आम्हाला किती चुकल्यासारखं झालं असतं!

तिसरी बस पंधरा मिनिटात आली आणि आम्ही मार्गस्थ झालो. चिनी लोकांच्या या संपर्कयंत्रणेचं कौतुक करावं तेवढं थोडचं! कुठेही पंधरा मिनिटांपेक्षा जास्त थांबावं लागलं नाही. हिरव्यागार डोंगरांच्या पायाशी विसावलेलं ते विस्तीर्ण तळं एखाद्या मोठ्या नदीसारखंच वाटत होतं. पर्यटकांच्या सगळ्या हौशी तिथे पुरवल्या जात होत्या. पोहायचं असेल तर तसे पोषाखही तेथे विकायला होते. बसायला टेबलं खुर्च्या होत्या. बाजूला चर खणून त्यात मासे पाळलेले होते. हवा तो मासा जेवणासाठी निवडावा. त्याच माशाला पकडून पंधरा मिनिटात त्याचा हवा तो चमचमीत प्रकार तुमच्यासमोर हजर! आम्ही शाकाहारी, अर्थातच नुसते पहाणारेच होतो!

या तळ्याकाठच्या डोंगरांवर चढायला छान पायऱ्या केलेल्या होत्या. अशाच एका टेकडीवर चढून आम्ही तेथून दूरवर दिसणारा अप्रतिम निसर्ग बघून आलो. बोटी दिसत होत्या. पण आमच्या सहलीत बोटींग नव्हतं.

इथलं फुलांचं मोठं मार्केट बघण्याचा योग एकदा आला. नजर ठरणार नाही इतकी सुंदर रंगीबेरंगी फुलं हारीने विकायला ठेवली होती. सर्व फुलांचं पॅकींग उत्तम केलेलं होतं. व्हाईट मॅग्नेलिया, लिली, ऑर्किड ही फुलं प्रामुख्याने दिसत होती. पण आपल्या फुलबाजारातील जाई-जुई, मोगरा, सोनचाफ्याचा घमघमाट मला तिथे जराही जाणवला नाही.

बाजूलाच कॉफीची एक फॅक्टरी होती. तिथे प्रत्येकाला वेगवेगळ्या कॉफींची चव घ्यायला देत होते. अर्थात त्यामुळे त्यांची बरीच विक्री झाली. तिथे टॉफीजही विकायला होत्या.

कंपन्यांनी प्रायोजित केलेला पारितोषिक वितरण समारंभ ज्या ठिकाणी होता ते World Harti-Expo Garden आम्ही रहात असलेल्या हॉटेलपासून अगदी दहा मिनिटांच्या अंतरावर होते. प्रवेशद्वारच इतकं आकर्षक होतं की आत प्रवेश केल्यावर काय काय पहायला मिळणार याची उत्सुकता होती. हिरवळ व रंगीबेरंगी फुलांची कलात्मक लागवड यांनी खूप मोठा परिसर व्यापलेला होता. खास लागवड केलेले काही भाग आम्ही पाहिले. एका भागात थंड प्रदेशातील वनस्पतींसाठी तसंच थंड वातावरण निर्माण केलं होतं. दुसऱ्या भागात निवडुंगाचे कितीतरी प्रकार पहायला मिळाले. इथल्या केळी तर सरळसोट वाढलेल्या आणि उंची दीड दोन मजल्यांपर्यंत होती.

गाडीतून फिरायचं म्हटलं तर दोन ताससुद्धा अपुरे पडतील इतका प्रचंड विस्तार या बागेचा होता. चीन मधील प्रत्येक प्रांतांचं (३४ प्रांत) प्रतिनिधित्व करणाऱ्या बागा (Domestic Exhibition garden ) तिथे होत्या. तसंच जगभरातील अठ्ठावीस राष्ट्रांच्या बागा आपापल्या देशांचं वैशिष्ट्य मिरवीत तिथे उभ्या होत्या. त्यात आपल्या भारताचं प्रतिनिधित्व करणारी बाग नव्हती हे पाहून आम्हाला थोडसं वाईट वाटलं पण काही वर्षांपूर्वी चीन आणि भारतामध्ये संबंध आतासारखे मैत्रीपूर्ण नव्हते हे सत्यही नजरेआड करता येत नव्हतं!

एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जायला छोट्या बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या आमच्या दिमतीला होत्या. तरीही आम्हाला दिलेल्या अवधीत संपूर्ण परिसर पाहणं केवळ अशक्य होतं.

जगाला चहाची ओळख करून देणाऱ्या चीनमध्ये येऊन चहाचं दुकान पहाणं, चहाचा स्वाद घेणं, हे अपरिहार्यच होतं. आम्हाला एका मोठ्या दोन मजली चहाच्या दुकानात नेण्यांत आलं होतं. या इमारतीतील प्रत्येक दर्शनी जागा, कोपरान् कोपरा सुशोभित केलेला होता. चीनमधील खेड्यांची दृश्ये त्यात दिसत होती. चीन चित्रशैलीतील खास चित्रंही तिथे होती.

एका छोट्या हॉलमध्ये खास 'चहापान' आयोजित केलेलं होतं. पारंपरिक पोषाखातील तीन युवती आमच्यासमोर चहा तयार करीत होत्या. त्यांच्या हातांच्या हालचाली इतक्या सफाईदार आणि मोहक होत्या की चहा घ्यायलाच पाहिजे असं वाटत होतं. सुंदर चिनी मातीच्या कपातून सर्वांना चहा दिला गेला आणि विशिष्ट पद्धतीने तो कसा घ्यावचा हेही दाखवलं गेलं. इथे चहात दूध घालत नाहीत. पण तरीही तो छान वाटत होता. 'जस्मीन टी' चवीला छान वाटला. 'ग्रीन टी' सर्वांत महाग होता. काही जणांनी चहापावडर खरेदी केली. आम्ही मात्र मनातल्या मनात युआन-रुपया यांचा हिशोब करत बसलो.

मुक्काम संपत आला, तसतशी आम्हांला घराची, शाळेची ओढ लागू लागली. तरीही मिळालेला प्रत्येक क्षण आम्ही इथला जास्तीत जास्त परिसर पाहण्यात सार्थकी लावत होतो.

आमच्या त्या हॉटेलच्या समोरील रस्त्यापलीकडे एक छानशी छोटीशी गल्ली सरळ गेलेली दिसत होती. दोन्ही बाजूंना बसक्या झाडांच्या रांगा व त्यापलीकडे टुमदार बंगल्यांच्या रांगा दिसत होत्या. आल्या दिवसापासून तो छोटासा रस्ता आम्हाला खुणावत होता. हॉटेल सोडायच्या दिवशी नाश्ता झाल्यावर मी व पूर्णिमा साठे त्या गल्लींत फेरफटका मारायला गेलोच. चीनमधल्या या मुक्कामातील ते आमचं शेवटचं भटकणं होतं.!!

(क्रमशः)

**सौ. अपर्णा सतीश भोळे**
A.M.B.A.
सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा,
नौपाडा, ठाणे- ४०० ६०२.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना (पूर्वार्ध)

*मूर्ती, प्रतिमा प्रतीके यांचा मानवी संस्कृतीवर खोलवर परिणाम झाला आहे. त्यामागील सामाजिक मानसिकता व त्या अनुषंगाने केलेले हे चिंतन. - संपादक*

## भूमिका

दिशाच्या मागील अंकात आपण भारतीय संस्कृतीवर जी साखळी पद्धतीने चर्चा केली. त्या 'विचार स्रोतावर' आपण एका अत्यंत महत्त्वाच्या वळणावर व गुह्य अशा 'दर्शनापर्यंत' येऊन पोचलो आहोत.

तेव्हा थोडी 'उजळणी' आवश्यक ठरावी.

भारतीय संस्कृतीचे जे स्वरूप आपण आज म्हणजे २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे राहून पहात आहोत. ते अत्यंत विस्कळीत, मिश्रपद्धतीचे, जीवनमुल्यांची भेसळ, मिसळ झालेल स्वरूप पहात आहोत.

''भारतीय संस्कृती ही 'कवींची निर्मीती' आहे, इतर देशाप्रमाणे आक्रहीमक आणि धर्मोपदशेक यांची ही रचना नव्हे. कवींनी अतिदूरच्या भविष्यकाळाचा वेध घेतला. आम्ही जे आज अनुभवीत आहोत ते वैदिक कवींच्या आणि त्यांच्या पूर्वज कवींच्या दिव्य दृष्टीच्या टप्प्यात होते. आक्रमक व धर्मोपदेशक केवळ जवळचा आसमंत आणि जवळचा वर्तमानकाळ पाहतात, आणि जेव्हां हे आक्रमक व धर्मोपदेशक नष्ट होतात, तेव्हा त्यांची संस्कृती देखील कोलमडते. परंतु कवींनी उभारलेली संस्कृती पुढे चालूच राहते. भारतीय राष्ट्राची संस्कृती कवींनी उभारलेली आहे, आणि तीच एक प्राचीन संस्कृती आहे, की जी नवीन संस्कृती म्हणूनही चालूच आहे.

भावार्थ ''Survey of Sanskrit literature''by Dr. C. Kunhan Raja

## कवी कोण? Visionary

'कवी' ह्या शब्दाचा अर्थ 'द्रष्टा' Seer of Truth असा येथे अभिप्रेत आहे. वेदामध्ये 'कव्य:सत्यश्रृत:' जड इंद्रियांना जे दिसते तेच सत्य मानणारा देह 'पशुवत' असतो. पण ऋषी व कवी यांना प्रत्यक्ष समारेच्या चित्रामागचे, वस्तूमागचे, घटनेमागचे 'अदृश्य', गूढ तत्त्व ही दिसते. वेदांनी सांगितलेले, गायलेले 'सत्य' हे 'श्रृती' म्हणून ओळखले जाते. त्याचा अर्थ 'Revealed Truth' असा आहे.

भारतीय संस्कृतीची जडण घडण करणाऱ्या आपल्या पूर्वजांना जे दिसले, जाणवले ते 'सत्य' व 'गहन' ज्ञान त्यांनी अनेक अंगानी, अनेक संज्ञांमध्ये, भाषेमध्ये भारतीय समाजाला उपलब्ध केले. त्याकरितां तुलनेने मानवाची सध्याची ज्ञानसाधने तोकडी पडतील. सध्याची 'सामाजिक भाषा' तोकडी वाटेल. का बरे?

## वैश्विक रचना

कारण, ह्या विश्वाच्या रचनेचा आराखडा त्यांनी प्रथम मांडला, 'पुरुषसूक्तात' केवळ १६ 'ऋग्वेद ऋचा' मध्ये तो सांगितला आहे. कोण आहे तो नारायण ऋषी, या सूक्ताचा रचयिता? कोणी म्हणतात कीं तोच परमेश्वर होय, त्यानेच स्वत: 'हे ज्ञान' मानवी समाजाला श्रुती व सूक्त रूपाने सांगितले पण, हे ज्ञान साध्या भाषेत सुद्धा म्हणजे 'संस्कृत भाषा', जिला 'देवभाषा' म्हणतात त्या सुद्धा भाषेत हे सामावण्यासारखे नाही व नव्हते!! **माहेश्वरी सूत्र व १४ नादांवर रचलेली ही 'देवभाषा'** त्यानंतर व्याकरण शास्त्राने संपृक्त अशी ही नंतर पाणिनी वगैरे नी संपादित केली!! ही संस्कृत भाषा मग, **मानवी भाषा** म्हणून वृद्धी पावली. तेव्हा अत्यंत सीमित (Conditional cognitive abilities) अत्यंत सामान्य कल्पनाशक्ती

(Imagination, Intuitive Capabilities) अत्यंत अशुद्ध गुणप्रवृत्तीच्या बुद्धीच्या, अशा मानवाला, हे ज्ञान ग्रहण करणे, संपादित करणे व संग्रह करणे हे दुरापास्त होते. त्याचबरोबर ह्या ज्ञानाचा पूर्ण फुलोरा किंवा विस्तार हा सुद्धा अनेक युगांच्या सांस्कृतिक 'जीवनाचा अविष्कार' ह्या रूपाच्या माध्यमाने होणार होता. जन्म जन्मांतरीच्या पुनर्जन्म पद्धतीने जीवनसातत्य लाभलेल्या भौतिक समाजालाच केवळ योग्य (भूमीवर), त्याचा 'पूर्ण अर्थ' प्राप्त होणार होता! हे त्या ऋषी वा देव अशा नारायणाला व त्या स्तरावरच्या व काळाच्या अधिकारी ऋषिवर्गाला, हे माहीत होते!!

<u>अव्यक्त जगाची जाणीव</u>

सगळ्यात मोठी अडचण होती ती म्हणजे या विश्वाचा ¼ भागच केवळ इंद्रियगोचर आहे. ¾ भाग हा अव्यक्त म्हणजे Unmanifested आहे.

याचा सरळ अर्थ हा की जो ज्ञान वृक्ष, आपण ज्याचे खोड, पाने, पुष्प, फुले, मोहर, फळे, फांद्या, हिरवे व रंगरूप पहातो, त्याचे 'बीज' जमिनीखाली (अव्यक्तात) आहे. शिवाय, जरी हे बीज खणून काढले तरी त्याच्या अंतरंगातील 'Eternal Cyclic Life' चा फॉर्म्यूलाचे ज्ञान भौतिक विज्ञानाने होणार नाही. आयझॅक न्यूटनला हे फळ खाली पडते, हे जाणवले धन्य त्याची!! पण ते खाली का पडले, प्रथम झाडाला उगवतेच वा लागतेच का? त्या फळाचा उगम संकरपद्धतीने Cross Pollination ह्या क्रियेने होतो हे मानवाला भौतिक दृष्टीने समजेल. पण, ही सहकारी जीवन योजना कोणत्या विधात्याने निर्माण केली व का, ह्यांचे ज्ञान होणार नाही-सहजपणे!! एव्हढेच काय, पण हे वृक्ष, प्राणी, ग्रह, तारे ह्यांचे अफाट विश्व पहावयाला 'हा', 'तू', मानव जन्मालाच मुख्यत: का आला? हा Witness 'भौतिक साक्षीदार' (माणूस)

या जगात धडपडायला का आला, हे कोडे त्याला प्रथम (सहज) पडणार नाही व पडलेच तर उलगडणार तर




चित्र नं १

नाहीच, हे त्या ऋषींना माहीत होते. <u>कारण ज्ञानाची पद्धती सुद्धा संस्कृतिबद्ध तार्किक पद्धतीने बांधलेली असते!!</u>

**संस्कृतीबद्ध योगबद्ध, कल्पनाशक्ती युक्त ज्ञान**

मी जी परिस्थिती सांगण्याचा प्रयत्न करतो आहे, तिचे अत्यंत हृद्य वर्णन महायोगी श्री. अरविंद करतात, ते पहा:-

"वेद व उपनिषदे, अरण्यके, कर्मकांडे ही एक समूच्चयपूर्वक आपल्या कल्पना शक्तीला आवाहन करताहेत.

"सर्व उपनिषदांत दुर्बोध आणि गहन असे 'बृहदअरण्यक' आधुनिक बुद्धीला मोठे चमत्कारिक पेच टाकते. त्यातील कल्पना आपणा आधुनिकाना अगदी दूरवर्ती आहेत असे म्हटले, तर त्याची भाषा त्याहूनही दूरची म्हणावी लागेल.

गहन, सूक्ष्म, दुर्लभ, तत्त्व-कल्पना व नाजूक मनोविज्ञान यांनी कल्पनातीत समृद्ध अशा या अरण्यकाने, आपल्या अतीव अलंकारिक आणि प्रतीकात्मक भाषेत सजवण्याचे ठरविले आहे. या 'ध्वनियुक्त बोलीचा' सराव

असलेल्या तत्कालीन वाचकांना ही भाषा तिच्या आतील थोर विचारसंपदेला साजेशी, भारी किंमतीची वाटलेली असणार! पण आपणा आधुनिकाना मात्र तीच गवसणी व्यत्ययकारी अवगुंठनाप्रमाणे वाटल्यावाचून राहात नाही दोघांतील हा आउपडदा बाजूला करणे, जुन्या वैदिक भाषेचे आणि रूपकांचे रूपांतर वर्तमानकालीन भाषासरणीत करणे, हाच या टीकेचा एकमेव उद्देश्य आहे.''

ह्या पुढे श्री. अरविंद 'स्वत:ची भूमिका' विशद करतात. 'प्राचीन ऋषींच्या विचारसमूहांत नम्रभावाने प्रवेश करणे, त्यांचे शब्द आपल्या अंतरंगात मुरू देणे, त्या शब्दांना आपल्या अंतरंगात आकार देऊ देणे, अनुकूल आणि प्रतिसंवेदनक्षम द्रव्यात त्या वेदवाणीचे प्रतिध्वनी घुमू देणे ही ती प्राचीन 'ज्ञानग्रहण पद्धती' होय.

'गिरां उपश्रुति चर, स्तोमाम् अभिस्वर,
अभिगृहीहि आ रुवा'

आपल्या अंतरात्म्याचे कान करून त्या प्राचीन वाणीने श्रवण करणे, आणि अंतरात्म्यात स्फुरणाऱ्या श्रुती वेदान्तरूप ज्ञानसूक्ताला प्रतिसाद, प्रतिध्वनी देतीलसे करणे, क्रमश: कंपायमान होऊ देणे आणि त्यांच्या प्रतिसादांमध्ये अधिक स्पष्टता, तीव्रता आणि परिपूर्णता आणणे ही विशदीकरण पद्धती मी अवलंबली आहे.'

'प्राचीन वेदान्ती ऋषी, माझ्या मते, गूढवादीच होते. पण, भाषेत भोंगळ आणि विचारात सैल असे स्वप्नाळू लोक' अशा अर्थाने नव्हे तर, **'अंत:प्रेरणामार्गी प्रतीकवादी'** या अर्थाने, मी त्यांना गूढवादी मानतो.

**'Intutional Symbolists'** याचा माझा अर्थ असा की, ते ऋषी, सर्व जगत् ही चैतन्याची एक चेष्टा, एक व्यापार मानीत, आणि सर्व जड (नामरूपात्मक) आकृतींना आणि जड शक्तींना ते गूढ, गूढतर, अन्तर्हित सद्वस्तूंच्या छाया आणि प्रतीके मानीत.'

तुम्ही म्हणाल की हे बृहदअरण्यक उपनिषद व त्याची गुह्य भाषा उलगडण्याची आवश्यकता काय वाटावी?

## अश्वमेध व बृहदअरण्यक प्रेरित अर्थ

बरोबर आहे!! 'अश्वमेध' हा शब्द आपण अनेक वेळा वाचला असेल. पण, या 'अश्वमेध' यज्ञाचा खरा बोध आज काय, पण गौतम बुद्धाच्या काळापूर्वीच नाहीसा झाला होता. तीच अवस्था 'गोमेध', 'पुरुषमेध' वगैरे यज्ञकृतींची झाली होती. या गूढ व महत्त्वाच्या यज्ञाच्या अत्यंत विकृत भौतिक कृती अर्थहीन व शुष्क कर्मकांडांच्या रूपाने त्यांच्या मूळ उद्देश्य व हेतू यांच्या विस्मरणाने व भौतिक अर्थ लावल्याने प्राणी हिंसेच्या वा हत्येच्या कृतीने आचरल्या जात होत्या. बुद्धाच्या आरोपी व आक्रमक दर्शनाने जरी ह्या विकृतींवर प्रकाशझोत पडला तरीही आज या मितीलाही त्या कृती खऱ्या अर्थाने घडत नाही आहेत.

पण, पुन्हा तुम्ही प्रश्न विचाराल की प्रथम या यज्ञाच्या पुनरुज्जीवनाची आवश्यकता काय आहे?

महायोगी अरविंद जे भारताच्या संस्कृतीच्या व वेदांच्या खऱ्या ज्ञानाच्या व हेतूच्या बाजूने कंबर कसून उभे आहेत ते म्हणताहेत,

'वेदविहित यज्ञकांडासंबधींची या उपनिषदाची भूमिका या प्रास्ताविक भागावरून पूर्णत: स्पष्ट होते, ही गोष्टही आपल्या दृष्टीने भाग्याची होय. कारण, त्यामुळे प्राचीनांच्या अप्रगल्भ बुद्धीवर आधुनिक सूक्ष्म कल्पना लादल्याचा, आपणावरील संभाव्य आरोप टळेल, तसेच असंस्कृत धर्मभोळेपणाला सुसंस्कृत गूढवादाचे रूप देण्याचाही आरोप टळेल.' (काही वेगडी संस्कृती अभिमानी असा प्रयत्न करण्यात गुंतले आहेत!! 'आपणास असे दिसून येणार आहे की, या उपनिषदांत अश्वमेध यज्ञ म्हणजे अध्यात्ममार्गातील (Spiritual Evolution कंस माझा ) एक मोठा पल्ला म्हणून मानण्यात आला आहे. हा यज्ञ म्हणजे जणु काय प्राय: जड अशा शक्तींच्या राज्यातून उच्च आध्यात्मिक मुक्ततेच्या प्रांतात होणारी उत्क्रांतिमय प्रगतीच होय.

उपनिषद द्रष्ट्या ऋषींच्या मते, अश्वमेधातील 'अश्व म्हणजे वेग आणि सामर्थ्य दर्शविणारे, बीजगणितातील

'क्ष' सारखे एक अज्ञात पदच होय!!' [x in Algebra or Calculus]

' उपनिषदांतील या रूपकमालिके वरून हेही उघड आहे की हे अश्वरूप सामर्थ्य हा वेग, म्हणजे एक जगद्व्यापी एक विश्वात्मक वस्तू आहे. ती वस्तू आपल्या अस्तित्वाने तिन्ही लोकाना भारून टाकते, काळाला व्यापून टाकते, दिगन्तात उड्डाण करते, आणि उड्डाणात आपल्या पाठीवर देव, मानव व दानव या सर्वांनाच वाहून नेते. हा अश्व अनंत विश्वाचा अश्व आहे. आणि तरीही तो अश्वमेधाचा अश्वही आहे.'

<u>Symbolism in Ashvamedh</u>

आता ह्या अश्वमेधात कोणते रूपक स्पष्टपणे सूचित केले आहे? <u>आपल्याला त्या 'Hint, Suggestion, Key,' कुंजिका, गुरुकिल्लीचा तलास घ्यावयाचा आहे.</u> त्या गूढ Symbolism चा अर्थ लावावयाचा आहे. हा अर्थ लावण्यासाठी कोणती यंत्रणा निसर्गाने वा ईश्वराने, ब्रह्माने भगवंताने आपल्याच शरीरात, मनात, बुद्धीत, कल्पनाशक्तीत, देहात, ज्ञानेंद्रियांत अंत:करणात, 'जीनस्' मध्ये ' (Genes) पूर्व जन्मीच्या संस्कारात योगसामर्थ्यात, निसर्गाच्या सहकारात, प्रकृतीच्या सहकारात (Enviornmental Support) दिली आहे ते सावकाश उलगडून पाहूच.

पण, प्रथम कोडे कोणते आहे? रूपक कोणते आहे व ते अनेक शतके किंवा युगेही ह्या ऋषींच्या मार्गदर्शनानेही न उलगडता गुप्त का राहिले आहे ते पाहू या!!

अश्वमेधातील रूपक - बृहद्अरण्यक उपनिषद

<u>'रूपकांचा वर्षाव'</u>

| भौतिक | वैश्विक संज्ञा (Form रूप) | अश्वाचा देह |
|---|---|---|
| १. | ॐ उष:काल | यज्ञीय अश्वाचे शिर |
| २. | सूर्य | नेत्र |
| ३. | वायू | श्वास |
| ४. | अग्नी(विश्वात्मक शक्ती) | उघडलेले तोंड |
| ५. | काल | यज्ञीय अश्वाचा आत्मा |
| ६. | स्वर्लोक | पृष्ठभाग |
| ७. | भुवर्लोक | उदर |
| ८. | पृथ्वी | पाऊल |
| ९. | अष्टदिशा | आठ बाजू |
| १०. | मधले प्रदेश | बरगड्या |
| ११. | विविध ऋतू | गात्रे |
| १२. | मास, पक्ष | पदाधार |
| १३. | ग्रहतारे | अस्थी |
| १४. | आकाश | मांस |
| १५. | किनारे | खाद्य |
| १६. | नद्या | रक्तवाहिन्या |
| १७. | पर्वत | यकृत, फुफुसे |
| १८. | वनस्पती सृष्टी | आयाळ |
| १९. | सूर्योदय | पुरोभाग (दर्शनीभाग) |
| २०. | सूर्यास्त | पार्श्वभाग |
| २१. | वीज चमकणे | अश्वाचे शरीर ताणणे |
| २२. | मेघ गर्जना | अंग झाडतो तेव्हा |
| २३. | वृष्टी होते | मूत्र विसर्जन |
| २४. | वाणी | अश्वाचा आवाज |
| २५. | सूर्योदय | शीघ्रगामी अश्वाच्या पुरोगामी भव्यता |
| २६. | रजनी | पार्श्वभागीची भव्यता |
| २७. | त्या- देवांसाठी<br>वाजिन-गंधर्वांसाठी<br>अर्वन - दानवांसाठी | अश्व-मानवांसाठी<br>वाहन झाला |
| २८. | समुद्र | सहोदर व जन्मस्थान |

(अपूर्ण, उत्तरार्ध पुढील अंकात:)

**यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट, अग्यारी लेन, ठाणे - १
दूरध्वनी क्र: २५३६८४५०,
ई-मेल yrsane@eth.net

# ब्रह्मांड व सौर परिवार
## (लेखांक चौथा)

*सूर्य हे सर्व जगाचे, ब्रह्मांडाचे मूळ कारण आहे.त्यामुळे सूर्याला देवत्व देऊन सूर्य विषयक विचार माणसाने केला. या सूर्य देवते संबंधातील श्री. मठ यांचा हा पुढील लेख.-* संपादक

### ब्रह्मांड

ब्रह्माण्डासंबंधी अनेकविध विचार केले गेले आहेत. ऋषी, मुनी, पुराणकार, भौतिकवादी, वैज्ञानिक या सर्वांनी विचार मांडले आहेत. परंतु यांच्या विचारात बरीच तफावत आढळून येते. खरे पाहिले असता ब्रह्माण्डासंबंधीचा निश्चित विचार अद्याप अस्पष्टच आहे. पृथ्वी ते अंतरिक्ष व त्या पुढे कितीतरी व्यापक असलेला अवकाश म्हणजे ब्रह्माण्ड होय. अशी सर्व सामान्य कल्पना असल्याचे मानावयास हरकत नाही. थोडक्यात पृथ्वी ते अंतरिक्ष व त्या पुढील सारा पसारा आणि आपल्या दृष्टीला न दिसणारे परंतु अति दूरवर विस्तृत असणारे क्षेत्र देखील ब्रह्माण्ड शब्दाने सूचित होते.

भूमंडळ, आकाश, असंख्य तारे, ग्रह, उपग्रह, नक्षत्र समूह आदी ब्रह्माण्डांत समाविष्ट केले जातात. याला विश्व असेही म्हणतात. वैज्ञानिकांच्या मते पृथ्वीच्या भोवताली चोहो बाजूंनी व्यापणारे वायुमंडळ, व क्षेत्र, तसेच जिथवर पृथ्वीची गुरुत्वाकर्षण शक्ती प्रभावित आहे. तेथपर्यंतचा परिसर म्हणजे विश्व होय.

थोडक्यात, पृथ्वी विश्वाचा एकभाग व विश्व ब्रह्मांडाचा अंशमात्र सूक्ष्म भाग आहे. ब्रह्माण्ड अति विस्तृत, त्यात विश्व व पृथ्वी दोन्ही समाविष्ट आहेत.

### सौर परिवार

आकाश म्हणजे नुसती पोकळी असे आपण मानतो. मात्र ती तशी नाही. कारण या आकाशात तारे, ग्रह, नक्षत्रे आदी आहेत. या असंख्य ताऱ्यांचे व नक्षत्रांचे परीक्षण करून शास्त्रज्ञांनी कितीतरी रोमांचकारक गोष्टी प्रदीर्घ अभ्यासाने शोधून काढल्या आहेत. यात पुराणकार व शास्त्रज्ञ यांच्यात एकवाक्यता नाही. पुराणकार श्रद्धामूलक विचार मांडतात तर शास्त्रज्ञ भौतिक विश्वाचे दृश्य स्वरूपातील यथार्थ विचार मांडतात.

आकाशाचे मोजमाप करणे अशक्य आहे. आजपावेतो कुणीही आकाशाची लांबी रुंदी ठरवू शकला नाही. गणितज्ञ देखील आकाश अनंत आहे एवढेच सांगतात. खगोलशास्त्रज्ञांनी या आकाशात प्रमुख सत्तावीस तारकापुंज असल्याचे निश्चित केले आहे. या प्रत्येक तारकापुंजाला नक्षत्र असे म्हटले आहे. प्रत्येक नक्षत्राचे स्वत:चे एक वैशिष्ट्य असलेले आढळते. त्यामुळे प्रत्येक नक्षत्र (तारकापुंज) वेगळेपणाने पाहाता येते. या सत्तावीस नक्षत्रांबद्दल खगोलशास्त्रज्ञांनी सखोल विवेचन केलेले आहे. प्रत्येक नक्षत्राची आकृती, रूप, आकार, क्षेत्र, पृथ्वीपासूनचे अंतर, त्याच्या प्रकाशाचा प्रभाव, गती, स्थिती, काळ, इत्यादी गोष्टींचा उहापोह केलेला आहे.

हा अभ्यास एकाच व्यक्तीकडून झालेला नाही. या विषयीचा अभ्यास शतकानुशतके व पिढ्यान् पिढ्या चालू आहे. आज ज्ञात झालेले संशोधन अंतिम आहे असे म्हणता येणार नाही. शास्त्रज्ञ रोज नवनवीन शोध घेण्यात मग्न झालेले आहेत. ब्रह्माण्डातील या गोष्टींचा शोध घेण्याचे काम चालू आहे. यासाठी वैज्ञानिकांनी अनेक उपकरणे बनविली आहेत. पृथ्वीपासून अंतर, कंपन, ध्वनी, प्रकाश, गती व प्रभाव या विषयांची नोंद घेण्यासाठी ही

उपकरणे उपयुक्त ठरतात.

### नक्षत्र समूह

तारकापुंजांना नक्षत्रे म्हणतात. त्यांना विशिष्ट नावे देण्यात आलेली आहेत. अशी सत्तावीस नक्षत्रे आज निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यांची नावे अशी आहेत. अश्विनी, भरणी, कृत्तिका, रोहिणी मृग, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वाफाल्गुनी, उत्तराफाल्गुनी, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, ज्येष्ठा, मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, शतभिषा, पूर्वाभाद्रपदा, उत्तरा भाद्रपदा, आणि रेवती. काही लोक अभिजित् हे २८ वे नक्षत्र मानतात. बरेच लोक श्रवण वा उत्तराषाढा, यात हे नक्षत्र समाविष्ट करतात. याप्रमाणे आजही सत्तावीस तारकापुंजे असल्याचे खगोलशास्त्रज्ञांनी मान्य केले आहे.

### राशी

नक्षत्रांचे समूह कल्पून राशी बनविण्यात आल्या आहेत. या राशी बारा आहेत. प्रत्येक रास ही दोन पूर्ण नक्षत्रे व तिसऱ्या नक्षत्राचा एक चतुर्थांश भाग यांनी बनविण्यात आली आहे. त्या राशींची नावे अशी आहेत. मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, धनु, मकर, कुंभ व मीन.

### <u>ग्रह समूह</u>

आकाशात सात प्रमुख ग्रह आहेत. ग्रह म्हणजे अति विशाल तारे -त्यांची नावे सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, बृहस्पती, शुक्र, शनी. या व्यतिरिक्त राहू व केतू हे ग्रह मानले गेले आहेत. हे ग्रह छाया मात्र आहेत, काल्पनिक आहेत, असे समजण्यात येते. शास्त्रज्ञांनी अलीकडे तीन नवीन ग्रहांचा शोध लावला आहे. युरेनस, न्येपच्यून व प्लुटो अशी त्यांची नावे आहेत. हे तारे पृथ्वीपासून दूर असून देखील आपल्या प्रकाशाने पृथ्वीला प्रभावित करतात. ऋतुपरिवर्तन, वातावरण, जीवजंतु, स्वास्थ्य, प्रकृती, रूची, स्वभाव, जीवनशक्ती या सर्वांचे कारण या ग्रहांची स्थिती, त्यांची गतिमानता, परस्पर युती व पृथ्वीपासूनचे अंतर आदी गोष्टी आहेत.

याप्रमाणे सर्व नक्षत्र समूह, राशी समूह, ग्रह समूह मिळून सौर मंडळाची रचना झालेली आहे. ब्रह्मांण्डातील विशालकाय ग्रह सूर्य हा आहे. विशालते बरोबरच अत्यंत तेजस्वितेमुळे हा ग्रहराज झाला आहे. याच्या भोवताली असलेले इतर ग्रह सौर परिवारातील मानले जातात. पृथ्वीदेखील सौर परिवारापैकी एक घटक आहे. अशाप्रकारे सर्व छोटेमोठे तारे, राशी, नक्षत्रे हे सर्व सौर परिवाराची अंग प्रत्यंगे आहेत. सौर परिवार म्हणजे सूर्य व त्याच्या सहवासातील इतर ग्रह.

आकाशात सूर्यासारखे अगणित तारे आहेत. काही छोटे, काही मोठे, काही पृथ्वीपासून दूर, काही अति दूर, हे तारे दुर्बीणीतूनदेखील दिसत नाहीत. मात्र त्यांची प्रकाश किरणे पृथ्वीला स्पर्श करतात. व ती परिणामकारकही आहेत. काही ताऱ्यांचे पृथ्वीवरील मानवांना दर्शन होत नसले तरी देखील पृथ्वीवर त्यांच्या प्रकाश किरणांचा परिणाम होत असतो. अत्यंत क्षीणरूपाने का होईना त्यांची किरणे पृथ्वीला स्पर्श करतात. प्रत्येक ग्रहाचा प्रकाश दूरवर पसरतो व त्याचा रंगही असतो. त्यामुळे प्रत्येक ग्रहाचे परिणामही वेगळे असतात.

### ग्रहांची वैशिष्ट्ये

सूर्य - सर्वाधिक ज्वलंत ग्रह याची किरणे अत्याधिक उष्णता व प्रकाश पृथ्वीवर निर्माण करतात.

चंद्र - याची किरणे शीतल व आल्हादकारक आहेत वनस्पती जग पुष्ट करतात.

मंगळ - याची किरणे तापदायक असतात. याच्या

स्पर्शाने प्राणिमात्रात उग्रभाव, तेजस्विता व दु:साहस प्रवृत्ती निर्माण होतात.

बुध - याची किरणे सौम्य आहेत. ही किरणे बुद्धी विवेकपूर्ण करतात.

बृहस्पती - ही किरणे प्राणिमात्राच्या उत्तमांगाला स्पर्श करताच प्राणिमात्र जागा होतो. सक्रिय होतो. जिज्ञासू होतो. बुद्धिमान होतो, याप्रमाणे ही किरणे प्रभावी आहेत.

शुक्र - राजस गुण निर्माण करतात. वैभव, विलास, कलात्मक प्रेरणा आदी निर्माण करण्यात शुक्राची किरणे प्रभावी आहेत.

शनी - व्यक्तिमात्रात उदासीनता निर्माण करतात. मती कुंठित करतात.

राहू व केतू - ही किरणे समीपस्थ ग्रहांच्या किरणांप्रमाणे प्रतिक्रिया करतात.

ब्रह्मांडात अनेकानेक तारे असूनही पृथ्वीवर त्यांचा फार मोठा प्रभाव पडत नाही कारण ते अत्यंत दूरवर आहेत. त्यांचा प्रकाश येण्यासाठी कित्येक प्रकाशवर्षे लागतात. नवग्रह हे सौर मंडळातील निकटचे तारे आहेत. त्यामुळे प्राणिमात्र त्यांच्या प्रकाश किरणाने प्रभावित होतात. तसेच अनेक प्रकारचे नैसर्गिक बदल घडतात. उदाहरणार्थ तुफान, वर्षा, अवर्षण, अतिवृष्टी, पडझड, भूकंप, थंडी, उष्णता, महामारी, उल्कापात इत्यादि या ग्रहांच्या गतिमानतेवर अवलंबून असतात.

केवळ मानवच नाही सर्व जीव जगत् त्यांची शारीरिक रचना, मनोवृत्ती, चेतनशक्ती, कार्यक्षमता या साऱ्या गोष्टी या ग्रहांच्या किरणांच्या प्रकाशाने प्रभावित होतात. थोडक्यात सौर परिवार हाच सृष्टीचा नियामक व नियंत्रक आहे.

### ज्योतिषशास्त्र व सूर्य

वस्तुत: ज्योतिषशास्त्र, ज्योति म्हणजेच प्रकाशाचे शास्त्र आहे. ब्रह्मांडात असलेल्या ग्रह, नक्षत्रसमूह, राशी, अनेकविध तारे यांची प्रकाश किरणे पृथ्वीला स्पर्श करतात. या सर्वांची स्थिती, प्रभाव, अंतर, अवधी या संबंधी विवेचन करणारे शास्त्र म्हणजे ज्योतिषशास्त्र होय. अखिल विश्वात निर्मिती, संहार, आवर्तन, परिवर्तन या सर्वांचे मूळ ही प्रकाश किरणेच होत.

ज्योतिषशास्त्राने काळाचेही सूक्ष्म ज्ञान होते. अगदी क्षण, पळे, घटिका, प्रहर, दिवस, रात्र, मास, वर्ष, आदींचे विवेचन त्याचप्रमाणे भूत, वर्तमान व भविष्य काळांतील स्थिती व घडणाऱ्या घडामोडी यांवर प्रकाश टाकणे शक्य होते. गंभीरतेने विचार केला असता हे स्पष्ट होईल की काळगती म्हणजे याच ग्रहांच्या, नक्षत्रांच्या गतीची प्रतिक्रिया आहे. कोणता ग्रह किती अवधीत कसा फिरत राहतो, त्यावेळी त्याची प्रकाश किरणे कशी असतात व त्यांचा सृष्टीवर कोणता प्रभाव पडतो या साऱ्या गोष्टींचे, काळ व प्रकाश यांचे ज्ञान करून देणारे शास्त्र हेच ज्योतिषशास्त्र होय. थोडक्यात ज्योतिषविद्या म्हणजे ग्रह, नक्षत्र, तारे यांची गती यांचा प्रभाव व भ्रमणाला लागणारा अवधी (काळ) इत्यादींचा परिचय करून घेणे होय.

### ब्रह्मांड व ग्रह

समस्त आकाश मंडळात, विश्वात, ब्रह्मांडात सूर्य हा सर्वाधिक विशाल, ज्वलन्त, तेजोमय, शक्तीसंपन्न व प्रभावशाली ग्रह आहे. इतर सर्व ग्रह याच्या आधीन आहेत. आणि ते सारे सूर्य शक्तीनेच प्रभावित आहेत. यामुळे हे सारे छोटेमोठे ग्रह सूर्याभोवती फिरत असतात. सूर्याच्या आकर्षण शक्तीमुळे हे सौर ग्रह एका विशिष्ट कक्षेत फिरत राहतात. सूर्यामुळे यांचे भ्रमण नियंत्रित केले गेले आहे.

सात ग्रहांना सर्वाधिक मान्यता प्राप्त झाली आहे.

भारतीय ज्योतिषशास्त्राने नऊ ग्रह मान्य केले आहेत. या संपूर्ण सौर मंडळाचे प्रतिनिधित्व व नियंत्रण सूर्य करतो.

काळपुरुषाच्या शरीराचे मानवी शरीर रचनेप्रमाणे विचार केला असता, त्याचे उत्तमांग म्हणजे शिर, याचे नियंत्रण ग्रहराज म्हणजे सूर्याकडून केले जाते. उत्तमांग हे मानवाचेही महत्त्वाचे अंग आहे. इथेच वाणी, श्रवण, दृष्टी, विचार, मेधा, आदि स्थित आहेत. त्याचप्रमाणे काळपुरुषाचा भागही वैशिष्ट्य पूर्ण असतो त्याचे नियंत्रण सूर्याकडून होते.

समस्त नक्षत्रसमूह बारा प्रमुख तारासमूहांत विभागले गेले आहेत. सूर्य नेहमीच कोणत्याना कोणत्या राशीत भ्रमण करतो. एका राशीत एक महिना भ्रमण असल्याने बारा राशींत भ्रमण करण्यासाठी त्याला एक वर्षाचा कालावधी लागतो. प्रत्येक राशीत सूर्य एक महिना भ्रमण करत असल्याने त्याला सौरमास ही संज्ञा आहे व वर्षाला सौरवर्ष म्हणतात. ज्योतिषशास्त्रात या संबंधी सविस्तर विवेचन केलेले आहे. यामुळे ठरावीक वेळी कोणताग्रह कोणत्या राशीत आहे, अन्यग्रह व नक्षत्रे यांची त्या समयी कोणती स्थिती असते त्यांचे परस्पर संबंध किती प्रभावी आहेत. या सर्व गोष्टींचा विचार या शास्त्रात करण्यात आलेला आहे. ग्रहांच्या प्रभावाबद्दलचा एक श्लोक असा आहे.

ग्रहा: राज्यं प्रयच्छन्ति ग्रहा:राज्यं हरन्ति च।
ग्रहैस्तु व्यापितं सर्वं जगत् एतत् चराचरम्।

सूर्य या ग्रहाला काळपुरुषाचे डोके मानले जाते म्हणजे सूर्य त्या भागाचे नियंत्रण करतो. कोणाच्याही जन्म लग्न कुंडलीवरून हे ध्यानात येते की त्या व्यक्तीचा जीवन क्रम कसा असेल. हा विषय अत्यंत जटिल व कष्ट साध्य आहे. तो तसा असूनही काही लोक याचा पाठपुरावा करतात व पारंगत पण होतात. ते या साऱ्या विश्वाच्या घडामोडींची भूत भविष्य वर्तमान काळाची अटकळही बांधतात.

विद्वान लोकांनी दीर्घकालीन संशोधनात असा निष्कर्ष काढलेला आहे की, ज्योतिषशास्त्र दृष्ट्या सूर्यदेव हा मानवाचे पित्ततत्व (रक्त) याचे नियंत्रण करतो. हा पुरुषग्रह आहे. ताम्रवर्णी असून क्रूर, कठोर, उग्र, प्रखर असा हा ग्रह आहे. हा सिंह राशीचा स्वामी आहे. मेष राशी याच्या दृष्टीने श्रेष्ठ तर तुला राशी प्रतिकूल, बुध याला समान धर्मी ग्रह, शुक्र व शनी बरोबर याचे विपरीत प्रभाव दृष्टीस पडतात. बारा राशी व प्रत्येकाचा भाव असा. १) शरीर, जीवन, आयु, २) धन द्रव्य संपदा ३) सामान्य सुख सहज सरळ जीवन ४) सुख, शक्ती मित्रता, ५) पुत्र ६) शत्रू ७) पत्नी ८) मृत्यू ९) धर्म १०) कर्म क्रियाशीलता ११) आय १२) व्यय. कुंडलीत हे भाव कायम स्वरूपाचे आहेत. या भावांत कोणताही ग्रह व राशी असू शकेल. त्या प्रमाणे त्या व्यक्तीची जीवन स्थिती जाणली जाते. हा विषय खूप व्यापक व अभ्यासनीय आहे.

थोडक्यात, सूर्य ग्रह प्रथम भावात असता कोणत्या गोष्टी संभवतात या प्रमाणे बारा भावांचा विचार करावयाचा असतो, हे महत्त्वाचे आहे. या साऱ्या गोष्टींचा साकल्याने विचार करून निर्णयाप्रत यावयाचे असते याला फलज्योतिष हे नाव आहे. हा वेगळा विषय आहे, इथे सूर्य व ज्योतिष शास्त्राशी त्याचा संबंध, या बद्दलचाच विचार करण्यात आलेला आहे.

(क्रमश:)

शं. बा. मठ

६, कुमार आशिष
राम मारुती रोड, ठाणे - ४०० ६०२.

•••

# परिसर वार्ता


## डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)

- 'अन्नातील भेसळ' या विषयावर बांदोडकर कॉलेज येथे दि. २७ जुलै रोजी शिबिर संपन्न झाले. यावेळी डॉ. राजन शास्त्री प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिबीरात अन्नातील भेसळ म्हणजे काय? त्याचे परिणाम, बुरशी, तिचे प्रकार, आढळ, कोकोकोलातील भेसळ इ. यांचे माहितीसह सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमास आठवीच्या सात विद्यार्थ्यांसह सौ. अपर्णा भट उपस्थित होत्या.
- ३० व ३१ जुलै रोजी 'गणित, विज्ञान विषयाचे पुनर्रचित अभ्यासक्रम' शिक्षक प्रशिक्षण वर्गास श्री. सोरटे व सौ. अडमुळे उपस्थित होत्या.



'आरोग्यम्'थायरोकेअर या विषयावर शिक्षकांशी संवाद साधताना श्री. अश्विनीकुमार खन्ना

- २ ऑगस्ट रोजी 'थायरो केअर' तर्फे श्री. खन्ना यांनी सर्व शिक्षकांना आरोग्य व शारीरिक संतुलन यावर व्याख्यान देऊन संपूर्ण आरोग्य तपासणी फक्त ९०० रु. त उपलब्ध करून दिली.
- ७ ऑगस्ट रोजी श्री. संतोष राय यांनी इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांना क्रेप व कार्ड पेपर्सपासून कमीत कमी वेळात आकर्षक अशा बाहुल्या, प्राणी, सजावटीच्या माळा प्रात्यक्षिकांसह तयार करून दाखविल्या व मुलांकडून करवून घेतल्या.
- 'सिंफनी म्युझिक ॲकॅडमी' तर्फे घेण्यात आलेल्या गायन स्पर्धेत कु. श्रद्धा यादव (१० अ) हिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.
- दि. १० ऑगस्ट रोजी भगवती विद्यालय येथे श्री. ज्योत्सना वझे पुरस्कृत 'वाचन संस्कृती प्रकल्प २००७' चे उद्घाटन रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे मुख्य संचालक श्री. विनय सहस्त्रबुद्धे यांच्या उपस्थितीत झाले. श्री. अशोक टिळक यांनी प्रास्ताविक केल्यानंतर श्री. वझे आजी व श्री. सहस्त्रबुद्धे यांचा परिचय व सत्कार झाला. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृतीचा विकास करण्यासाठी शिक्षकांसोबत शालेय पातळीवर प्रयत्न केले जावेत असे आवाहन यावेळी केले गेले. कार्यक्रमास प्रकल्प प्रमुख म्हणून सौ. कारंडे-जोशी उपस्थित होत्या.
- १० ऑगस्ट रोजी श्रावणी सोमवारी श्रीकौपिनेश्वर मंदिर आयोजित सेवा प्रकल्पात इ. ७ वी च्या स्काऊट/ गाईड गाईड कॅप्टन सौ. आशालता गांगुर्डे यांच्यासह सहभागी झाले. भाविकांना रांगेत सोडण्याचे काम करून व्यवस्थापकांस सहकार्य केले.



ओंकार कुचिक

- १४ ऑगस्ट रोजी पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य व क्रीडा संचनालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांच्या विद्यमाने जिल्हा क्रीडा अधिकारी व जिल्हा क्रीडा परिषद ठाणे द्वारा आयोजित शालेय जिल्हा-स्तर जलतरण स्पर्धा २००७ मध्ये १४ वर्षाखालील गटात ८ वी तील कु. ओंकार कुचिक याने

  १०० मी. बटरफ्लाय - सुवर्णपदक
  १०० मी. फ्रिस्टाईल - रौप्यपदक व ५० मी. बटरफ्लाय स्पर्धेत कांस्यपदक मिळविले. त्याला श्री. पांचाळ, श्री. गवई व स्विमींग क्लबचे श्री. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

- स्वातंत्र्याच्या हीरकमहोत्सवाचे औचित्य साधून दि. १० ऑगस्ट रोजी समर्थ भारत व्यासपीठ - समन्वय प्रतिष्ठान तर्फे वि. ह. भूमकर यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आले. १० ब, क, ड व ९ इ चे विद्यार्थी व्याख्यानास उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन सौ. सोमण व श्री. खैरनार यांनी केले.



श्री. भूमकर सरांना वृक्षभेट देताना उपमुख्यध्यापिका सौ. कळमकर - १० ऑगस्ट

- १५ ऑगस्ट रोजी ठाणे महाविद्यालय परिसरात इ. ५ वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या हस्तलिखितांचे व भित्तीपत्रिकांचे प्रकाशन कार्याध्यक्ष मा. डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते झाले. त्यांचे विषय

  इयत्ता ५ वी - भारतातील पर्यटनस्थळे

  ६ वी - सूर्यमाला
  ७ वी - शास्त्रज्ञांची ओळख
  ८ वी - जगातील सात आश्चर्ये
  ९ वी - शांता शेळके यांची गीते.
  १० वी - मानवी शरीरसंस्था

- 'सेंटर फॉर सायको एज्युकेशनल केअर' तर्फे इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी १२ शनिवारी प्रत्येकी १ तास याप्रमाणे श्री. प्रसन्नजित कांबळे मार्गदर्शन करणार आहेत. त्यात विद्यार्थ्यांनी स्मरणशक्ती वाढवून लेखन कौशल्य कसे आत्मसात करावे? व पूर्ण तयारीनिशी परीक्षेला कसे सामोरे जावे यासंबंधी मार्गदर्शन केले जाणार आहे.

- १८ ऑगस्ट रोजी 'कै. राजीव गांधी अक्षय उर्जा अभियान' अंतर्गत जिल्हा परिषदेतर्फे सरस्वती सेकंडरी स्कूल येथे 'अपारंपारिक उर्जा' या विषयांतर्गत विज्ञान प्रतिकृती प्रदर्शनात सौ. अपर्णा भट यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.



नागपंचमीचे औचित्य साधून माजी विद्यार्थी स्वप्नील पवार सापांची माहिती देताना

- स्वप्नील पवार या माजी विद्यार्थ्याने नागपंचमीचे औचित्य साधून 'नाग व सर्प' या विषयावरील १८ प्रकारच्या सापांच्या दृकश्राव्य माहितीसह १०० पारदर्शिका सहावीच्या विद्यार्थ्यांना दाखविल्या व सापांबद्दलच्या अंधश्रद्धा दूर केल्या.



दंतचिकित्सक डॉ. सुबोध फडके.

- 'इंडियन डेंटल असोसिएशन' तर्फे मौखिक आरोग्य विषयक तक्ते व त्यांची माहिती शाळेचे माजी विद्यार्थी डॉ. पुष्कर शेजवलकर, डॉ. सुबोध फडके, डॉ. जयंत देशपांडे, डॉ. समीर बोडखे यांनी इ. ५ ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांना देऊन दातांच्या आरोग्याचे महत्त्व स्पष्ट केले.

- २३ ऑगस्ट रोजी ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळाने पुरस्कृत 'क' कवितांचा हा इ. १ ली ते १० वी च्या पाठ्यपुस्तकातील मराठी कवितांना चालो लावून त्या सादर करण्याच्या शुभारंभाच्या प्रयोगास शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. कळमकर व सौ. सुमिता माने या गडकरी रंगायतन येथे उपस्थित होत्या.



मंगळागौरीच्या खेळातील नृत्याविष्कारातील प्रार्थना

- संस्कार भारतीच्या 'मातृशक्ती' शाखेतर्फे २४ ऑगस्ट रोजी मंगळागौरीच्या खेळांचे शिबीर आयोजित करण्यात आले. मा. सौ. सुमेधा बेडेकर यांच्या मार्गदर्शनानुसार मंगळागौरीच्या सर्व खेळांच्या प्रात्याक्षिकांत इ. ९ वी च्या विद्यार्थीनी सहभागी झाल्या.



संस्कृत दिन
श्री. अजय गोटखिंडीकर

- संस्कृत दिनाच्यानिमित्ताने २५ ऑगस्ट रोजी 'वैदिक गणित' या विषयावर पटनी कॉम्प्युटर्सचे श्री. अजय गोटखिंडीकर यांचे भाषण आयोजित केले गेले. त्यांनी गणितातील मोटमाठ्या संख्यांचे गुणाकार व अनेकानेक युक्त्या १० वी च्या मुलांना सांगितल्या.



वृक्षबंधन घोषवाक्ये

- 'पर्यावरण दक्षता मंच' व इ. ७ वी च्या स्काऊट व गाइडस् यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत वृक्षबंधनाचा कार्यक्रम पार पडला. उपमुख्याध्यापिका सौ. कळमकर यांनी पर्यावरण व प्रदूषणाबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. श्री. कोळी यांनी स्वत: तयार केलेली घोषवाक्ये आणि सौ. बोरवणकर यांनी तयार केलेल्या राख्या वृक्षांवर बांधण्यात आल्या.
- इ. ६ व ७ वी च्या विद्यार्थ्यांना दर मंगळवार व शुक्रवारी 'रामदेव बाबा' यांच्या ठाणे विभागातील मंडळाच्या सदस्यांकडून शाळेत योगासने व प्राणायाम शिकविले जातात.
- 'विश्व हिंदू परिषदेतर्फे' दरवर्षी १ लाख गणपती अथर्वशीर्षाची आवर्तने म्हणण्याचा संकल्प केला जातो. याच संकल्पाचा एक भाग म्हणून दि. ३१/०८/०७ व १/९/०७ रोजी इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांकडून शाळेत त्यांनी गणपती अथर्वशीर्ष म्हणून घेतले. आवर्तनानंतर मुलांना प्रसाद वाटप करण्यात आले.
- दि. २ सप्टें. रोजी 'संस्कार भारती'तर्फे घेण्यात आलेल्या गायन स्पर्धेत शाळेतील कु. मृणाली कराळे (८क) हिला कृष्ण गीत (गवळण) यासाठी उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा (प्राथमिक विभाग)

❖ IPM गणित परीक्षेचा निकाल

| इ. | एकूण विद्यार्थी संख्या | उत्तीर्ण विद्यार्थी | अनुपस्थित | अनुउत्तीर्ण |
|---|---|---|---|---|
| ५ वी | १० | ८ | २ | ० |
| ६ वी | १३ | ५ | ४ | ४ |
| ७ वी | ५ | ४ | १ | ० |
| ८ वी | २ | १ | १ | ० |
| ९ वी | ५ | ३ | २ | ० |

प्राविण्य प्रमाणपत्र मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे

| इयत्ता | नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | कु. वरद जोशी | ९२ |
| ७ वी | कु. वृषाली चौधरी | ९२ |
| ७ वी | कु. कुणाल चौधरी | ९६ |
| ९ वी | कु. ओजस गोहाड | ९८ |

- कु. तृप्ती केणी हिने ऑनलाईन बोर्नव्हिटा प्रश्नमंजुषा जिंकली आणि तिला माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांना भेटण्याची संधी मिळाली.
- पेंढारकर कॉलेज, डोंबिवली येथे आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय आंतरशालेय टेबल टेनिस स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलींच्या गटात पुढील विद्यार्थिनींनी अंतिम फेरी जिंकली आणि राज्यस्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली.

१. वृषाली प्रसादे २. ऋचा अमडेकर
३. सानिका ओक ४. प्रणिता बनावली
५. आभा मुतालिक

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

- दि. २ जुलै २००७ रोजी महाविद्यालयाच्या N.S.S. युनिटचे उद्‌घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग मॅडम यांच्या हस्ते झाले.
- **फिल्म सोसायटी ऑफ इंडियाचा कॅम्पस् सिनेक्लब सुरू**

जोशी-बेडेकर महाविद्यालयात फिल्म सोसायटी ऑफ इंडियाचा कॅम्पस् सिनेक्लब सुरू करण्यात आला आहे.

महाविद्यालयात झालेल्या एका समारंभात ख्यातनाम दिग्दर्शक, खासदार श्याम बेनेगल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून या क्लबचे उद्‌घाटन झाले. प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक व फिल्म सोसायटीचे उपाध्यक्ष किरण शांताराम, चित्रपट समीक्षक सुधीर नांदगावकर, विद्या प्रसारक मंडळाचे डॉ. विजय बेडेकर, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंग, प्रा. एन. एस. बारसे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्राचार्या डॉ. सिंग यांनी प्रास्ताविक केले. मुलांना जगभरातील चांगले सिनेमे पहाता यावे, त्यांच्यात वैचारिक प्रगल्भता यावी यासाठी या चित्रपट मंडळामार्फत आंतरराष्ट्रीय कीर्तीचे भारतीय चित्रपट संस्थेच्या महासंघाकडून प्राप्त झालेल्या यादीमधून दर महिन्याला दोन चित्रपट दाखविले जातील अशी माहीती त्यांनी दिली. सुधीर नांदगांवकर यांनी ठाणे महाविद्यालयानंतर सोमय्या महाविद्यालय, पुणे विद्यापीठ अशा सर्व कॉलेज कॅम्पस्मध्ये चित्रपट मंडळ सुरू करण्याचा मानस व्यक्त केला.

दृकश्राव्य माध्यम हे समाजावर प्रभाव टाकणारे प्रभावी माध्यम आहे असे श्याम बेनेगल यांनी सांगून चित्रपट कसा पहावा, त्याचे रसग्रहण कसे करावे हे लहानपणासून शिकण्याची गरज व्यक्त केली. डॉ. विजय बेडकर यांचेही यावेळी भाषण झाले. प्रा. एन.एस. बारसे यांनी आभार मानले. श्याम बेनेगल दिग्दर्शित 'मंथन' या चित्रपटाचा खेळ यावेळी दाखविण्यात आला.

महाविद्यालयातील या चित्रपट मंडळाचे कामकाज सुरळीतपणे चालण्यासाठी विद्याप्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करण्यात आले असून महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह या सचिव म्हणून काम पाहितील.

- दि. २० जुले २००७ रोजी 'स्टाफ ॲकॅडमी' तर्फे 'Legacy of Eurocentrism' या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. या प्रसंगी डॉ. भरत सेठ व डॉ. संजीवनी जैन हे वक्ते म्हणून उपस्थित होते.

▸ दि. २५ जुलै २००७ रोजी 'स्कॉलर्स अॅकॅडमी तर्फे 'कात्यायन' सभागृहात सौ. शैलजा मुळे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी 'Getting Ready for the world of work, Career, Life Skills and Personality Development' या विषयावर आपले मौलिक विचार मांडले.

**मुलींनी सुशिक्षित आत्मनिर्भर आणि धीट झाले पाहिजे**

▸ स्त्रियांवरील अत्याचार आणि लैंगिक छळ याबाबतीत मोठ्या प्रमाणात जनजागृती होणे गरजेचे असून मुलींनी सुशिक्षित बनण्याबरोबरच आत्मनिर्भर आणि धीट झाले पाहिजे अशी अपेक्षा ठाण्याचे पोलीस आयुक्त डी. शिवानंदन यांनी व्यक्त केली.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या वतीने उघडण्यात आलेल्या महिला विकास कक्षाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना त्यांनी ही अपेक्षा व्यक्त केली. डॉ. शकुंतला सिंह आणि महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा प्रियंवदा टोकेकर व्यासपीठावर उपस्थित होत्या.

डी. शिवानंदन यावेळी पुढे म्हणाले, एकूण गुन्ह्यांपैकी समाजातील ९० टक्के गुन्हे स्त्रियांच्या बाबतीत घडत असून गुन्हे नोंदविण्याचे प्रमाण तर खूपच कमी आहे. देशामध्ये महाराष्ट्रात सुशिक्षित महिलांचे प्रमाण अधिक असल्याने आपल्या राज्यात परिस्थिती वेगळी आहे. छेडछाड, मानसिक छळ, शिवीगाळ, मारहाण, हुंड्यासाठी जाळून मारण्याचे प्रकार, लैंगिक छळ, बलात्कार, आदी अनेक प्रकारचे गुन्हे महिलांच्या बाबतीत घडत असून त्यांची कारणे, कौटुंबिक व समाज परिस्थिती यात आहेत. पोलिसांची कामे आणि कायदेकानून याबद्दलची माहिती यावेळी पडद्यावर दाखविण्यात आली.

महिलांनी पुरुषांपेक्षा आपण कमी नाही तर समान आहोत ही, जाणीव ठेवायला हवी असे त्यांनी सांगितले. ठाणे पोलीस आयुक्तालयात गुन्हे नोंदविण्यासाठी महिलांसाठी विशेष कक्ष यापूर्वीच उघडण्यात आला असून त्याचा महिलांनी उपयोग करून घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाला विद्यार्थी-विद्यार्थिनींची भरगच्च उपस्थिती होती. थोरले बाजीराव पेशवे सभागृहात हा कार्यक्रम झाला. प्रारंभी डॉ. शकुंतला सिंग यांनी प्रास्ताविक केले. प्रियंवदा टोकेकर यांनी कार्यक्रमाचा उद्देश नमूद करून डी. शिवानंदन यांचा परिचय करून दिला, त्यानंतर झालेला प्रश्नोत्तराचा कार्यक्रमही रंगला. विद्यार्थी व शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांना डी. शिवानंदन यांनी समर्पक उत्तरे दिली.

▸ दि. ३० जुलै २००७ रोजी 'पालक-शिक्षक सभा' आयोजित करण्यात आली होती. 'कात्यायन सभागृहात पार पडलेल्या या सभेत जवळजवळ २०० हून अधिक पालक सहभागी झाले होते. या प्रसंगी जमलेल्या पालकांना शिक्षकांचा परिचय करून देण्यात आला. उपप्राचार्यांनी परीक्षा, निकाल तसेच विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले. तर प्राचार्या डॉ. सिंग यांनी महाविद्यालयाच्या 'अभ्यास' तसेच 'अभ्यासेतर उपक्रमांविषयी माहिती दिली.

▸ दि. ३० जुलै याच दिवशी 'सेतु-एक मुक्त संवाद नव्या पिढीशी' या अनोख्या कार्यक्रमाचे आयोजन 'थोरले बाजीराव पेशवे' सभागृहात करण्यात आले होते. त्या प्रसंगी वामनराव मुरांजन विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका सौ. इंदिरा कुलकर्णी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. त्या प्रसंगी 'आजी-आजोबांसारख्या ज्येष्ठांकडूनच संस्कृतीचे संचित नव्या पिढीला मिळत असते. त्या दृष्टीने अशी वयोवृद्ध माणसे म्हणजे अमूल्य ठेवाच आहेत,' असे प्रतिपादन सौ. इंदिरा कुलकर्णी यांनी केले.

\- संकलित

# दहा दहाची माहिती पहा

*मुंबईच्या शहरी जीवनात 'दहा दहा' च्या लोकल गाडीचा 'पोकळ श्वास' घ्यावाच लागतो. पण त्या श्वासाबरोबर 'दहा' चे वेगळे संदर्भ विश्व ... आपल्या माहितीसाठी. - संपादक*

**शरीरातील दहा मर्मस्थाने**

१) शिरोबंधन २) रसनाबंधन ३) कंठ ४) रक्त ५) हृदय ६) नाभी ७) मूत्राशय ८) शुक्र ९) ओज १०) गुद

**दहा चंचल 'म'कार**

१) मन २) मधुकर ३) मेघ ४) मानिनी ५) मदन ६) मरूत-वारा ७) मा (लक्ष्मी) ८) मद ९) मर्कट १०) मत्स्य

**काव्याचे दहा प्रमुख प्रकार**

१) महाकाव्य २) लघुकाव्य ३) खंडकाव्य ४) गद्यकाव्य ५) चित्रकाव्य ६) विडंबनकाव्य ७) पंडितीकाव्य ८) कूटकाव्य ९) शाहिरीकाव्य १०) चम्पूकाव्य

**कीर्तनाचे दहा प्रमुख प्रकार**

१) संगीतप्रधान २) मोदप्रधान ३) व्यवहारप्रधान ४) बोधप्रधान ५) तर्कप्रधान ६) वक्तृत्वप्रधान ७) शास्त्रप्रधान ८) धर्मप्रधान ९) भक्तिप्रधान १०) ज्ञानप्रधान

**सत्पुरुषांची दहा लक्षणे**

१) भक्ती २) परमेश्वरावरनिष्ठा ३) निर्भयता ४) ध्यान ५) वैराग्य ६) सरलता ७) करुणा ८) निर्जनप्रियता ९) अनिंदा १०) शास्त्रनिष्ठा

**मंत्रसिद्धीसाठी दहा संस्कार**

१) जनन २) दीपन ३) बोधन ४) ताडन ५) अभिषेक ६) विमलीकरण ७) तर्पण ८) जीवन ९) गोपन १०) आप्यायन

**धूपाचे दहा प्रमुख प्रकार**

१) यक्षधूप (राळ) २) कृकधूप ३) अनंतधूप ४) विजयधूप ५) श्रीपिष्ट ६) अगरूझर्झर ७) पत्रिवाह ८) पिंडधूप ९) विपदन १०) सर्पनिर्मोचनधूप

**दहा क्षेत्रे**

१) काशी २) पुष्पगिरी ३) कांची ४) निवृत्ताख्या (निवृत्तीसंगम) ५) अलंकापुरी ६) श्रीशैल ७) श्रीविरूपाक्ष ८) सेतुबंध रामेश्वर ९) केदार १०) गोकर्ण

**दहा सत्त्वगुण**

१) आनंद २) प्रीती ३) उद्वेग ४) प्राकाश्या ५) पुण्यशीलता ६) संतोष ७) श्रद्धालुता ८) सरलता ९) त्यागशीलता १०) ऐश्वर्य

**दहा सर्वौषधी**

१) कोष्ठ २) जटामांसी ३) साधी हळद ४) आंबेहळद ५) मुरमांसी ६) शिलाजीत ७) चंदन ८) वेखंड ९) चाफा १०) नागरमोथा

**दहा ब्रह्मसूत्र भाष्याकार व त्यांची भाष्ये**

१) श्री शंकराचार्य - शारीरिक भाष्य - अद्वैतमत
२) श्री भास्काराचार्य -भास्करभाष्य - भेदाभेदमत
३) श्री रामानुजाचार्य - श्रीभाष्य-विशिष्टाद्वैत
४) श्री माध्वाचार्य-पूर्णप्रज्ञाभाष्य - द्वैतमत
५) निंबकाचार्य-वेदांत पारिजात सौरभ-द्वैताद्वैतमत
६) श्रीकंठाचार्य- शैवभाष्य-शैवविशिष्टाद्वैतमत
७) श्रीपती आचार्य-श्रीकरभाष्य-वीरशैव-विशिष्टद्वैतमत
८) वल्लभाचार्य अणुभाष्य-शुद्धाद्वैतामत ९) विज्ञान

भिक्षु आचार्य - विज्ञानामृतभाष्य - अधिभागाद्वैतमत
१०) श्री बलदेवाचार्य-गोंविंदभाष्य-अचिंत्य भेदाभेदमत

**दहा विश्वेदेव**

१) ऋतु २) दक्ष ३) वसू ४) सत्य ५) काल ६) काम ७) धुनी ८) रोचन ९) पुरुरवा १०) आर्द्रव

**ईश्वरप्राप्तीच्या दहा विद्या**

१) उग्दीथविद्या २) संवर्गविद्या ३) मधुविद्या ४) पंचाग्निविद्या ५) आत्मविद्या ६) शाण्डिल्यविद्या ७) देहरविद्या ८) भूमविद्या ९) दीर्घायुष्यविद्या १०) मन्थविद्या

**चक्राचे दहा प्रमूख प्रकार**

१) रथचक्र (गाडीचे चाक) २) कुलालचक्र (कुंभाराचे चाक) ३) श्रीचक्र (तंत्रशास्त्र) ४) आयुधचक्र ५) सहस्रारचक्र ६) षट्चक्र (योगशास्त्र) ७) धर्मचक्र (गूढशक्तीचे प्रतीक) ८) राजचक्र (सार्वभौमत्वाचे प्रतीक) ९) सिद्धचक्र १०) कर्मचक्र (कर्मांचे प्रतीक)

**महाकालीची दहा नावे**

१) महामाया २) महाकाली ३) महामारी ४) क्षुधा ५) तृषा ६) निद्रा ७) तृष्णा ८) एकवीरा ९) कालरात्री १०) दुरत्यया

**महासरस्वतीची दहा नावे**

१) महाविद्या २) महावाणी ३) भारती ४) वाक् ५) सरस्वती ६) आर्या ७) ब्राह्मी ८) कामधेनू ९) वेदगर्भा १०) धीश्वरी

संकलन : द. हा. दहात्मे

---

**भटका आवाज**

मोबाईच्या बॅटरी वृत्ताचा स्फोट झाला आणि मोबईल खरोखरच सुरक्षित आहे का यावर लोकचिंतन सुरू झाले. मोबाईलला मराठीत 'भटका आवाज' म्हणतात. पांढरपेशांच्या भाषेत तो 'भ्रमणध्वनी' होतो तर अंडरवर्ल्डवाले त्याला 'तोता' म्हणतात. या साधनाबाबत किमान सुरक्षा काय घ्याल त्याबद्दल-

- रेडिएशनचा धोका असतो, त्यामुळे लहान मुलांना मोबाईल 'मुळीच' देऊ नये. त्यांच्या कवटीची त्वचा पातळ असल्याने विकासावस्थेतील मेंदूत कायमचा बिघाड होतो.
- मोबाईलवर 'किमान आवश्यक' तेवढेच बोलावे, तास न् तास बोलल्यास रेडिएशनमुळे पडदा खराब होतो व कर्णबधिरता येते.
- 'हँडस् फ्री' ची सोय शक्य तेथे वापरावी. कारण या सोयीमुळे मोबाईचा डोक्याशी संबंध कमी येतो.
- कंबरेजवळ, मांडीवर येणाऱ्या खिशात वा छातीवर येणाऱ्या फोनचा आवाजाचा परिणाम होऊन हृदय प्रभावित होते वा वंध्यत्व येते. म्हणून शरीरापासून मोबाईल लांबच ठेवावा.
- मोबाईल ही सोय आहे, 'स्टेटस् सिम्बॉल' नाही हे लक्षात ठेवा.

- सौ. प्रणाली सोहोनी
पाचपाखाडी, ठाणे.